Digitization by eGangotri-South Center

ॐ

प्रश्नोपनिषद्

अथवा

सत्यनारायणाचा खरा अर्थ

श्री नारायण स्वामीकृत अर्थ-व्यास्तवरहितचे

मराठी भाषान्तर

18.3
18.3
देवनागरी

प्रकाशक

का. बा. तारकर

५० कुमारा चाळ, गुंबादेवी, मुंबई २

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South-Center

पिप्पलाद व प्रश्नकर्ते सहा ऋषी

CC-0. Mumukshu Bhawan Varanasi Collection. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

स्व. वा. बाबाजी अनाजी तारकर

उर्फ

अण्णासाहेब

जन्म

कार्तिक कृ. १ शके १७८८
ता. २३।११।१८६६

मृत्यु

माघ शु. १४ शके १८७२
ता. २०।२।१९५१

—: यांच्या स्मरणार्थ :—

हें पुस्तक जिज्ञासूंना सद्धर्माचें यथार्थ ज्ञान
देण्यासाठीं अर्पण करीत आहों.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

श्री प्रश्नोपनिषद्

अल्प परिचय व विषय प्रवेश



प्रश्नोपनिषदावर मराठी भाषेंत अनेक ग्रंथ प्रसिद्ध झाले असून त्यांत या ग्रंथानें भर कां घालण्यांत येत आहे हा प्रश्न साहजिकपणें उद्भवतो, त्याचें उत्तर देणें प्रसंगोचित असल्यामुळें तें देणें इष्ट वाटतें.

वर उल्लेख केलेले ग्रंथ विस्तृत असून ते उपनिषदांचा अभ्यास करणारांसाठीं लिहिलेले आहेत. या ग्रंथांत प्रश्नोपनिषदांचे मंत्र-त्यांतील शब्दांचे अर्थ व भावार्थ व तो देखील श्री नारायणस्वामी यांनीं हिंदी भाषेंत प्रश्नोपनिषदाचें जें भाषांतर केलें आहे त्याचें मराठी भाषेंत भाषांतर दिलें आहे. तें देण्याचा हेतू सामान्य जनतेला या उपनिषदांत काय लिहिलें आहे तें कळावें हा आहे. ही कल्पना सन १९४७ सालीं श्री बाबाजीशेट अनाजी तारकर यांनीं सुचविली. ता. २३-११-४७ रोजीं त्यांचा ८१ वा वाढदिवस साजरा करावा असें त्यांच्या इष्ट मित्रांना वाटलें, व त्यांनीं ती गोष्ट त्यांना कळविली; त्याला श्री तारकरांनीं उत्तरा दाखल सांगितलें कीं " माझा सन्मान करूं नका, मला मानपत्र नको, तुम्हांला जर कांहीं करावयाचें असेल तर मी जीं धर्मतत्वें मानतों व पाळतों त्याचा प्रचार करा, त्या साठीं वैदिक ग्रंथांचें मराठी भाषेंत प्रकाशन करा; हल्लीं श्री सत्यनारायणाच्या पूजा विकृत स्वरूपांत करण्यांत येतात, त्यांचा गूढ अर्थ म्हणजे खरी देव पूजा कशी करावी, देव म्हणजे काय-हें सर्वांना सुगम होण्यासाठीं प्रश्नोपनिषदाचें आणि सोळा संस्काराचें ज्ञान लोकांना मिळेल असे ग्रंथ मराठी भाषेंत प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करा म्हणजे माझें समाधान होईल. "

सदर दोन ग्रंथ प्रसिद्ध करण्याची जबाबदारी वाढदिवस समारंभाच्या चालकांनीं स्वीकारली, तो समारंभ थाटानें साजरा झाला, पण ते ग्रंथ त्यांना प्रसिद्ध करतां आले नाहींत. सदर समारंभाचे प्रसंगीं श्री. तारकरांनीं उत्तरा दाखल

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

केलेल्या भाषणांत ते म्हणाले "धर्म प्रसार विद्वानांचें कार्य आहे. विद्वानांना या कार्यांत उत्तेजन देण्यासाठीं द्रव्याची सोय असावी लागते..... आपल्यापैकीं कांहीं सद्धर्माभिमानी प्रसन्न मनानें हें कार्य करण्याचें मनावर घेतील तर त्या प्रीत्यर्थ मी दहा हजार रुपये आज त्यांचे हवाली करणें भाग्याचें समजतों" श्री तारकरांनीं हें जाहिर केल्यावरून त्याचा आधार घेऊन सदर ग्रंथ प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारणाऱ्यांनीं पुढील उपाय योजना केली. "वैदिक प्रकाशनाबाबत विचार करतां, ही सभा असें ठरविते कीं श्रीयुत बाबाजी अनाजी तारकर हे स्वतः एक फंड काढून वैदिक प्रकाशनाचें काम करणार आहेत असें त्यांनीं सभारंभाचे वेळीं जाहीर केलें आहे आणि त्यांचे चिरंजीव श्रीयुत काशीनाथ-भाऊ यांनींही आजच्या सभेंत त्या लगत कबूली दिली आहे; म्हणून हें वैदिक प्रकाशनाचें कार्य श्री० बा० अ० तारकर यांजकडे सोंपवावें. तसेंच या समितिकडे जी रक्कम शिल्लक राहील ती श्रीयुत तारकर यांना वरील कार्यासाठीं देण्यांत यावी."

यावरून श्री. तारकरांनीं प्रश्नोपनिषदाच्या त्यांना मान्य असलेल्या श्री नारायण-स्वामीकृत हिंदी ग्रंथाचें भाषांतर पं० श्री० दा० सातवळेकर यांच्याकडून करून घेतलें व तें या ग्रंथाच्या द्वारें प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

श्री० बा० अ० तारकर यांनीं या ग्रंथाचीं आरंभीचीं मुद्रितें पाहिलीं व आपलें समाधान व्यक्त केलें. ता. २०-२-१९५१ रोजीं त्यांचें देहावसान झालें. त्यांच्या इच्छेनुसार हें प्रकाशन त्यांच्या हयातींत झालें असतें तर त्यांची इच्छा अल्प प्रमाणांत पुरी झाल्याचें समाधान त्यांना वाटलें असतें, पण योगायोग तसा नव्हता म्हणून त्यांच्या पश्चात् हा ग्रंथ प्रसिद्ध करून त्यांची त्या बाबतची इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे.

श्री० बा० अ० तारकर यांच्या विषयीं दोन शब्द लिहिणें प्रस्तुत आहे. त्यांचा जन्म व बालपण गरीबींत गेलें. मराठी शिक्षण खेडेगावांत मिळेल तितकें त्यांनीं घेतलें. निर्वाहासाठीं बालवयांत मुंबई गांठली. नोकरी करण्यांत कांहीं

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

वर्षे घालविलीं. पुढें भांडीं करण्याच्या धंद्यांत त्यांनीं प्रवेश मिळविला व दीर्घोद्योग, सचोटी, लोकांची गरज ओळखून त्याप्रमाणें माल बनविणें इत्यादि गुणामुळें त्यांनीं आपल्या कारखान्याला प्रसिद्धि मिळविली व त्याला स्थैर्य व सुस्थिती प्राप्त करून दिल्यावर तो त्यांच्या पुत्रद्वयांच्या ताब्यांत देऊन त्यांनीं धंद्यांतून आपलें आंग काढून घेतलें.

श्री तारकरांना धर्माच्या खऱ्या कल्पनांची आवड होती. धंद्याच्या निमित्तानें आर्य समाज पंथाच्या धार्मिक मताविषयीं त्यांना प्रेम वाटूं लागलें. तें पुढें वाढीस लागून त्या मतांचा प्रचार व प्रसार त्यांनीं आमरण केला. आर्य समाजामार्फत छापलेले ग्रंथ विकत घेऊन ते त्यांनीं फुकट वाटले. धंद्या व्यक्तिरिक्त मिळेल तो वेळ आर्य समाजाची मतें ज्यांच्याशीं संबंध येईल त्यांना समजावून ते सांगत. थोडक्यांत म्हणजे पगारी प्रचारकापेक्षां त्यांनीं पगार न घेतां स्वतः झीज सोसून त्या मतांचा प्रचार व प्रसार अहर्निश व आमरण केला. त्यांच्या हयातींत कोकणांतील कित्येक खेड्यांतून व इतरत्र विवाह अंत्येष्टि वगैरे कित्येक संस्कारविधी वैदिक पद्धतीनें करण्याचा प्रघात दीर्घोद्योगानें रूढ करण्यांत त्यांनीं यश मिळविलें.

वर्ग व जाति वर्चस्व मानल्यानें मानवांत कृत्रिम भिन्नता उत्पन्न होते. ईश्वरान सर्व मानवांना उत्पन्न केलें व मोक्ष मिळविण्याचा सर्वांना हक्क आहे. जातिभेद व तदंगभूत वर्ण-वर्चस्व हे भेद कृत्रिम आहेत. यास्तव ते दूर केले पाहिजेत. हें आर्य समाजाचें एक तत्व आहे. त्याला अनुसरून त्या समाजानें वैदिक ग्रंथाचें निरीक्षण करून त्यांचे अर्थ लावले आहेत.

मानवांत समता मानणें इष्ट आहे. तसें मानल्यास अनेक कटकटी आपो आप दूर होतील. सर्व सुखी होतील. शांति नांदेल आणि प्रत्येकाला ईश्वराची भक्ति करतां येईल व तिच्या द्वारें मोक्षप्राप्ति मिळेल. हें तत्व सर्वांना पटणारें आहे.

हिंदु धर्मांतील प्रचलित धर्माचरणांना विकृत स्वरूप प्राप्त झालें आहे. तें दूर झालें पाहिजे असें श्री तारकरांचें मत होतें व त्या दिशेनें त्यांनीं आमरण आचरण केलें व इतरांना उदाहरण घालून दिलें.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

श्री सत्यनारायणाची पूजा जी सध्यां प्रचारांत आहे ती पाहून त्यांना फार खेद होत असे. देवाला नवस करावा. तो सिद्धिस गेला म्हणजे त्याची पूजा करावी हें सत्यनारायणाच्या पूजेला सध्यां स्वरूप प्राप्त झालें आहे. तें अनिष्ट आहे. सत्य म्हणजे खरा व नारायण म्हणजे देव त्याचें ज्ञान लोकांना प्राप्त झालें पाहिजे व तें प्रश्नोपनिषदांत विषद केलें आहे; म्हणून त्याचें भाषांतर करून तें लोकांना मिळावें अशी त्यांची मनीषा होती व ती पूरी करणें हा उद्देश हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याच्या मुळाशीं आहे.

ती त्यांची इच्छा त्यांचे सुपुत्र या ग्रंथाच्या प्रकाशनानें पूर्ण करीत आहेत.

प्रश्नोपनिषद् ग्रंथांत जें वर्णिलें आहे तें वाचकांनीं हा ग्रंथ वाचल्यास त्यांना कळेल. हें उपनिषद् प्राचीन आहे. त्यांत सहा ऋषी परब्रह्माचा शोध करण्याच्या इच्छेनें पिप्पलाद ऋषिकडे गेले व प्रत्येकानें एक असे त्या सहा जणांनीं सहा प्रश्न विचारले. ते यापुढें पृष्ठ १ ते ४८ वर छापले आहेत ते वाचावे.

ईश्वर व मानव यांच्या मधील परस्पर संबंधाचें विवेचन पूर्वाचार्यांनीं जें केलें आहे, त्या योगें द्वैत अद्वैत व त्यांचे विशिष्ट प्रकार अस्तित्वांत आले व त्याप्र अनुसरून भक्तिचें स्वरूप, मोक्षाचे मार्ग व प्रकार त्यांनीं भिन्न वर्गिले आहेत. त्याचें स्पष्टीकरण त्यांनीं पुरुष-प्रकृति; ब्रह्म-माया; परमात्मा-जीवात्मा इत्यादि-जे त्यांच्या विचारप्रणालींना व मताला पोषक होईल त्याचा आधार घेऊन आपलीं मतें त्यांनीं प्रसृत केलीं.

वेदान्तांत या विषयाला जें महत्व देण्यांत आलें आहे त्याचें ज्ञान मिळवून तें आचरणांत आणावें हें मानवाचें कर्तव्य आहे. तें ज्ञान या प्रश्नोपनिषदांत जितकें आलें आहे तें लोकांना कळावें या साठीं हा ग्रंथ जिज्ञासूंना भेटीदाखल देण्यांत येत आहे.

७९ डमरखाडी, मुंबई ९;
१८ मे १९५१

आ० ना० सुर्वे
बी. ए., एलएल. बी.
ॲडव्होकेट (ओ. एस.)

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

ॐ

प्रश्नोपनिषद्

श्री नारायण स्वामीकृत अर्थ-व्याख्येसहितचें मराठी भाषान्तर

सुकेशा च भारद्वाजः शैव्यश्च सत्यकामः सौर्य्यायणी च गार्ग्यः कौशल्यश्चाश्वलायनो भार्गवो वैदर्भिः कबन्धी कात्यायनस्ते हैते ब्रह्मपरा ब्रह्मनिष्ठाः परं ब्रह्मान्वेषमाणा एष ह वै तत्सर्वं वक्ष्यतीति ते ह समित्पाणयो भगवन्तं पिप्पलादमुपसन्नाः ॥ १ ॥

उपनिषदाचा प्रस्ताव

अर्थ— (सुकेशा च भारद्वाजः) भरद्वाजाचा पुत्र सुकेशा, (शैव्यः च सत्यकामः) शिविचा पुत्र सत्यकाम, (सौर्यायणी च गार्ग्यः) सौर्याचा मुलगा गार्ग्य, (कौशल्यः च आश्वलायनः) अश्वलाचा मुलगा कौशल्य (भार्गवः वैदर्भिः) भृगुचा पुत्र वैदर्भी, (कबंधी कात्यायनः) व कत्याचा पुत्र कबंधी, (ते ह एते ब्रह्मपराः ब्रह्मनिष्ठाः) ते हे सुप्रसिद्ध स्वतः ब्रह्मपरायण व ब्रह्मनिष्ठ असतांही (परं ब्रह्म अन्वेषमाणाः) परब्रह्माचा अधिक शोध करूं इच्छिणारे, (एष ह वै) हा ऋषि निश्चयानें (तत् सर्वं वक्ष्यति इति) तें सर्व सांगेल असें समजून (ते ह समित्पाणयः) ते प्रसिद्ध ऋषि हातांत समिधा घेऊन (भगवन्तं पिप्पलादं उपसन्नाः) भगवान् पिप्पलाद ऋषि जवळ आले. (१)

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

तान् ह स ऋषिरुवाच भूय एव तपसा ब्रह्मचर्य्येण श्रद्धया संवत्सरं सँवत्स्यथ, यथाकामं प्रश्नान् पृच्छथ यदि विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम इति ॥ २ ॥

अर्थ— (तान् ह स ऋषिः उवाच) त्यांना तो पिप्पलाद ऋषि म्हणाला कीं, (भूयः एव) पुनः तुम्ही (तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संवत्सरं संवत्स्थथ) तप, ब्रह्मचर्य आणि श्रद्धेनें एक वर्षभर येथें रहा व मग (यथाकामं प्रश्नान् पृच्छथ) तुमचे इच्छित प्रश्न विचारा, (यदि विज्ञास्यामः) आम्हांला जें माहीत असेल (सर्वं ह वः वक्ष्याम इति) तें सर्व तुम्हांला सांगूं. (२)

व्याख्या— वरील प्रश्नोत्तरावरून तीन गोष्टी सिद्ध होतात, त्या अशा कीं—

१ जिज्ञासु साधक आपली जिज्ञासा पूर्ण करण्यासाठीं गुरुजवळ समिधा घेऊन जात असत. समिधा घेऊन जाण्याचा भाव असा आहे कीं जिज्ञासूच्या मनामध्यें असलेली आचार्यविषयक श्रद्धा प्रत्यक्ष क्रियात्मक रूपामध्यें प्रकट व्हावी.

२ आचार्य जों पर्यंत जिज्ञासूला आधिकारी समजत नसत, तों पर्यंत त्याला ब्रह्मविद्येचा उपदेश देत नसत. या सहा जिज्ञासूंनाही एक वर्षभर आश्रमामध्यें रहावयास जें पिप्पलाद ऋषिनें सांगितलें तेंही याच परीक्षेसाठीं होय.

३ जर हे उत्तम जिज्ञासु असतील तर त्यांचा वेळ व्यर्थ जाऊं नये यासाठीं आचार्य ऋषिनीं प्रारंभींच ब्रह्मप्राप्तीचीं साधनें सांगितलीं; तीं हीं कीं ब्रह्मचर्य, तप आणि श्रद्धा. पण या जिज्ञासूंची या सूत्ररूप सांगण्यानें तृप्ती झाली नाहीं, म्हणून त्यांनीं वर्षभर तेथें रहावयाचें स्वीकारलें.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South,Center

अथ प्रथमः प्रश्नः

अथ कवन्धी कात्यायन उपेत्य पप्रच्छ। भगवन्! कुतो ह वा इमाः प्रजाः प्रजायन्त इति ॥ ३ ॥

तस्मै स होवाच प्रजाकामो वै प्रजापतिः स तपोऽतप्यत, स तपस्तप्त्वा स मिथुनमुत्पादयते। रयिञ्च प्राणञ्चेत्येतौ मे बहुधा प्रजाः करिष्यत इति ॥ ४ ॥

पहिला प्रश्न

अर्थ-- (अथ कवन्धी कात्यायनः उपेत्य पप्रच्छ) नंतर एक वर्ष झाल्यावर कत्याचा पुत्र कवंधी आचार्यांजवळ गेला व त्यानें आपला प्रश्न विचारला. हे भगवान्! (कुतः ह वै इमाः प्रजाः प्रजायन्ते इति) कोणापासून या सर्व प्रजा उत्पन्न होतात बरें! (३)

अर्थ-- (तस्मै स ह उवाच) त्या प्रश्नकर्त्या कवंधी ऋषिला त्या पिप्पलाद आचार्यांनीं असें उत्तर दिलें कीं (सः वै प्रजाकामः प्रजापतिः तपः अतप्यत) त्या जगत् उत्पत्तिची इच्छा करणाऱ्या प्रजापतिनें तप केलें. (स तपः तप्त्वा) त्यानें तप केल्यानंतर (सः रयिं च प्राणं च मिथुनं उत्पादयते) त्यानें रयि व प्राण यांची जोडी उत्पन्न केली. व (एतौ मे बहुधा प्रजाः करिष्यतः इति) हे दोघे माझ्यासाठीं अनेक प्रकारची प्रजा उत्पन्न करतील. (४)

व्याख्या-- या उत्तरांत दोन विचार लक्ष्यांत घेणें श्रेयस्य आहेत-

१ प्रजेच्या कामनेनें प्रजापतिनें तप केलें. यास तपाचें दुसरें नांव ईक्षण असें आहे. महाप्रलयानंतर जगताची उत्पत्ति करूं इच्छिणाऱ्या जगत्कर्त्यामध्यें स्वभावतःच एक इच्छा उत्पन्न होते, ती ही कीं आतां प्रलयाचा अवधि संपला व आतां सृष्टीचा प्रारंभ झाला पाहिजे. या इच्छेलाच उपनिषदांच्या

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

भाषेमध्यें ईक्षण असें म्हणतात व पिप्पलाद ऋषिनीं याच ईक्षणाला तप म्हटलें आहे. अशी इच्छा होणें अगदीं स्वाभाविकच आहे. पण अशी इच्छा होतांच एक प्रकारची गति उत्पन्न होते व ती जड प्रकृतिमध्यें प्रविष्ट होऊन त्या प्रकृतिमध्यें ती हालचाल उत्पन्न करते. यामुळें प्रकृतिमध्यें विकृति उत्पन्न होते व ती प्रकृति जगताची उत्पत्ति व्हावी अशा स्थितिमध्यें येऊं लागते. वेद व उपनिषद् यांमध्यें या कारणासाठीं ईश्वराला गतिदाता असें म्हटलें आहे. हा ईश्वर गति उत्पन्न करतो हें खरें, परंतु तो स्वतः मात्र गतिमध्यें येत नाहीं. तो स्वतः अचल राहून सर्वांना चालना देतो. (**तत् एजति तन्नैजति** । यजु० ४०।५). अरिष्टाटलनेंही ईश्वराला "गतिमध्यें न येणारा गतिदाता" असें म्हटलें आहे (Unmoved mover).

२ प्राण आणि रयि या काय वस्तु आहेत वरें किं ज्यांपासून हें जग बनत असतें ? प्राणाला यद्यपि अग्नि व अत्ता (खाणारा) असें म्हटलेलें असलें, तसेंच रयिला भोग्य, अन्न व खाद्य असें म्हटलेलें असलें, तरी येथें प्राण असें त्या ईश्वर प्रदत्त गतिला म्हटलेलें आहे, किं ज्या गतिला वैज्ञानिक शक्ति (Energy) असें म्हणतात. व याच गतिमुळें विकृत झालेल्या प्रकृतिलाच रयि असें म्हटलेलें आहे, याच रयिला वैज्ञानिक प्रकृति (Matter) असें म्हणत असतात. वैज्ञानिकांच्या परिभाषेमध्यें प्राण असें ज्या शक्ति (Energy) ला म्हणतात व रयि असें ज्या प्रकृति (Matter) ला म्हणतात, या दोहांच्या संमेलनानें प्रकृतिची विकृति होते व ती विकृतिच सूक्ष्म अवस्थेपासून स्थूल स्थूल होत जाते व या अवस्थांलाच महत्तत्त्व, अहंकार, पञ्च तन्मात्रा, दहा इन्द्रियें, मन, (सूक्ष्म भूत) आकाश, वायु, अग्नि, जल व पृथिवी (स्थूल भूतें) असें म्हणतात. हीं सूक्ष्म व स्थूल भूतें केवल प्रकृतिचेच गतिरहित विकार नव्हेत. तर प्रकृति व गति यांच्या संघाताचें (Matter Combined with energy) हें कार्य आहे. वास्तविक स्थिति अशी आहे कीं जोंपर्यंत ईश्वरानें दिलेली गति शक्ति प्रकृतिच्या महा-प्रलयावस्थेमध्यें घुसून प्रकृतिच्या सत्त्व-रज-तम यांच्या साम्यावस्थेमध्यें विषमता उत्पन्न करीत नाहीं, तोंपर्यंत मूल प्रकृति विकृत होत नाहीं व जोंपर्यंत ती विकृत बनत नाहीं, तोंपर्यंत प्रकृतिपासून जगताची उत्पत्ति होऊं शकत नाहीं.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

आदित्यो ह वै प्राणो रयिरेव चन्द्रमाः रयिर्वा एतत्सर्वं यन्मूर्त्तञ्चामूर्तञ्च तस्मान्मूर्तिरेव रयिः ॥ ५ ॥

अर्थ— (आदित्यः ह वै प्राणः) सूर्य हा निश्चयें करून प्राण आहे आणि (रयि एव चन्द्रमाः) चन्द्रमा रयि आहे. (यत् मूर्तं च अमूर्तं च) जें स्थूल व सूक्ष्म असें जगत् आहे (रयिः वै एतत् सर्वं) तें सर्व रयि आहे. (तस्मात् मूर्तिः एव रयिः) म्हणून स्थूल प्रकृतिला रयि असें म्हणतात. (५)

व्याख्या— या वचनामध्यें प्राणाला सूर्य व चन्द्राला रयि म्हटलेलें आहे. सूर्याचा सूर्यपणा हा (त्यांतील प्रकाश व उष्णता) त्या ईश्वर प्रदत्त गतिचा विकृत प्रकृतिशी संबंध होण्याचा परिणाम आहे. चन्द्रमा हें नांवही या दोन वस्तुंच्या संघाताचेंच नांव आहे. या दोहों मधील अन्तर सूक्ष्मत्व व स्थूलत्व, गतिच्या प्रमाणाचें न्यूनाधिकत्व किंवा स्वयं प्रकाशी होणें न होणें यांवर अवलंबून आहे. सूर्य चन्द्रापेक्षां अधिक सूक्ष्म व अधिक गतिमान आहे, म्हणून त्याला प्राण (सूक्ष्म शक्ति) म्हणतात व चन्द्राला रयि (स्थूल शक्ति) म्हटलें आहे. यांनांच भोक्ता व भोग्य असेंही म्हणतात.

अथादित्य उदयन्यत्प्राचीं दिशं प्रविशति, तेन प्राच्यान्प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते । यद्दक्षिणां यत्प्रतीचीं यदुदीचीं यदधो यदूर्ध्वं यदन्तरा दिशो यत्सर्वं प्रकाशयति, तेन सर्वान्प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते ॥ ६ ॥

अर्थ— (अथ आदित्यः उदयन्) आतां पहा कीं सूर्य उगवूं लागला असतां (यत् प्राचीं दिशं प्रविशति) जेव्हां तो पूर्व दिशेमध्यें प्रविष्ट होतो (तेन प्राच्यान् प्राणान् रश्मिषु संनिधत्ते) तेव्हां तो पूर्व दिशेमध्यें राहणाऱ्या प्राणवायूंना आपल्या किरणांमध्यें ठेवून देतो. (यत् दक्षिणां) जेव्हां दक्षिण दिशेला, (यत् प्रतीचीं) जेव्हां पश्चिम दिशेला, (यत् उदीचीं) जेव्हां उत्तर दिशेला, (यत् अधः) जेव्हां खालीं व (यत् ऊर्ध्वं) जेव्हां वर (यत् अन्तरा दिशः) जेव्हां अवान्तर दिशांमध्यें (यत् सर्वं प्रकाशयति) जेव्हां त्या सर्वांला तो प्रकाशित करतो, (तेन सर्वान् प्राणान् रश्मिषु संनिधते) तेव्हां

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

ल्या प्रकाशानें ल्या ठिकाणच्या सर्व प्राणांनां आपल्या किरणांमध्यें तो ठेऊन देतो. (६)

व्याख्या— सूर्याचा उदय झाला म्हणजे सर्व दिशा प्रकाशित होतात व सर्व ठिकाणचे प्राण त्याच्या किरणांत समाविष्ट होतात. प्राण किरणांमध्यें समाविष्ट होतात याचे अभिप्राय दोन आहेत—

१ ईश्वरानें दिलेली गति-शक्ति प्राण-शक्ति सर्वांत अधिक सूर्यकिरणांमध्यें राहते. व (२) पृथिवीच्या चारही बाजूंचा वायु सूर्यकिरणांच्या योगानें प्राण-शक्तिनें संयुक्त होऊन प्राण्यांच्या जीवनाला फारच उपयोगी होतो.

स एष वैश्वानरो विश्वरूपः प्राणोऽग्निरुदयते । तदेतदृचाभ्युक्तम् ॥ ७ ॥

विश्वरूपं हरिणं जातवेदसं परायणं ज्योतिरेकं तपन्तम् ।
सहस्ररश्मिः शतधा वर्त्तमानः प्राणः प्रजानामुदयत्येष सूर्य्यः ८

अर्थ— (सः एषः वैश्वानरः विश्वरूपः प्राणः) तो हा सर्व जीवांमध्यें राहणारा अनेक प्रकारचा प्राणवायु आहे. हाच (अग्निः उदयते) अग्निरूप सूर्य उदय होत असतो. (तत् एतत् ऋचा अभिउक्तं) तेंच या मंत्रानें सांगितलें आहे. (७)

अर्थ— (विश्वरूपं हरिणं) अनेक रूपें धारण करणारा, अनेक किरणांनीं युक्त, (जातवेदसं परायणं) प्रकाशमय व सर्वांचा आश्रय असा हा (एकं ज्योतिः तपन्तं) एक मात्र प्रकाश प्रकाशमान होत आहे. हा (सहस्ररश्मिः) हजारों किरणांचा (शतधा वर्तमानः) अनेक प्रकारांनीं राहणारा (प्रजानां प्राणः) प्रजांचा प्राण असा (एषः सूर्यः उदयति) हा सूर्य उगवत आहे. (८)

व्याख्या— प्राण हा प्राण अपान आदि अनेक रूपांनीं प्राण्यांमध्यें रहात असतो हें सर्वांना प्रत्यक्षच दिसत आहे. तो अग्नि-आदित्य-रूपानें प्रकाशतो असें, जें येथें म्हटलें आहे त्याचा भाव असा आहे कीं तो आदित्याच्या प्रकाशानें तेजोमय होत असतो.

२ जो हा मन्त्र येथें प्रमाणवचन म्हणून दिला आहे, त्यामध्यें सूर्य हा प्राण-रूपानें उदय होतो असें सांगितलें आहे. या प्रतिपादनांमध्यें कांहींसुद्धां विरोध

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

नाहीं. पहिल्या वचनामध्यें प्राण वायुसाठीं व दुसऱ्या वचनामध्यें प्राण हा ईश्वर प्रदत्त गतिसाठीं प्रयुक्त झालेला आहे. हें लक्ष्यांत ठेवावें.

संवत्सरो वै प्रजापतिस्तस्यायने दक्षिणञ्चोत्तरं च। तद्ये ह वै तदिष्टापूर्ते कृतमित्युपासते ते चान्द्रमसमेव लोकमभिजयन्ते। त एव पुनरावर्त्तन्ते, तस्मादेते ऋषयः प्रजाकामा दक्षिणं प्रतिपद्यन्ते एष ह वै रयिर्यः पितृयाणः ॥९॥

अर्थ-- (संवत्सरः वै प्रजापतिः) वर्ष निश्चयाने प्रजापति आहे, (तस्य दक्षिणं च उत्तरं च अयने) यांचीं दक्षिण व उत्तर अशीं दोन अयनें आहेत. (तत, ये ह वै इष्ट-आपूर्त कृतं इति उपासते) यांत जे सकाम यज्ञ व विहीर तलाव आदि आपूर्त स्मार्त कर्में करतात, (ते चान्द्रमसं एव लोकं अभिजयन्ते) ते चन्द्रलोकाला जिंकतात, चन्द्रलोकाला प्राप्त होतात. (ते एव पुनः आवर्तन्ते) ते पुनः परत येतात. (तस्मात् एते प्रजाकामाः ऋषयः) म्हणून हे प्रजेची इच्छा करणारे पुरुष या (दक्षिणं प्रतिपद्यन्ते) दक्षिणायनाला प्राप्त होतात. (एषः पितृयाणः रयिः) हा पितृयाण रयि आहे. (९)

व्याख्या-- वर्षाला प्रजापति मानून त्याचे दोन भाग येथें केले आहेत. एक दक्षिण व दुसरा उत्तर. सूर्य सहा-महिने ध्रुव रेषेच्या वर असतो त्याला उत्तरायण म्हणतात व दक्षिणेच्या वाजूस असतो त्याला दाक्षिणायन म्हणतात. अयन म्हणजे भाग, वर्षाचा कालविभाग. दक्षिणायनाच्या तुलनेनें उत्तरायण चांगलें असें मानले जातें. म्हणून उत्तरायणाला देवयान (मोक्ष मार्ग) असें म्हणतात व दक्षिणायनाला पितृयान स्वर्ग प्राप्ति करण्याला उपयोगी पडणारा मार्ग असें मानलें आहे.

या उपनिषदामधील ह्या व याच्या पुढपुढच्या वचनामध्यें जें पितृयान व देवयानाचें वर्णन आहे, तें छांदोग्य उपनिषदांतील पञ्चाग्नि विद्येचा सूक्ष्म संकेतरूप आहे. मरणानंतर होणाऱ्या तीन गतिंमध्यें एक गति अशी आहे कीं मनुष्य पापपुण्य मिश्रित कर्में करतो, व त्यांच्याबद्दल तो मानवी अथवा पाशवी योनीमध्यें जातो. दुसरी गति ही आहे कीं मनुष्य श्रेष्ठ कर्में सकाम

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

बुद्धिनें करतो, त्यांचें फल स्वतःस मिळावें अशी इच्छा धरून हीं कर्में तो करतो, यामुळें त्याला मानवी योनिं मधील सर्व श्रेष्ठ योनिमध्यें जन्म मिळतो. या योनीला देवयोनि असें म्हणतात व यामध्यें बहुधा क्लेश होत. नाहींत म्हणून यांचें नांव स्वर्ग असें ठेवलेलें आहे. पितृलोक, चन्द्रलोक, अथवा स्वर्गलोक हीं नावें याच श्रेष्ठ मनुष्य-देवयोनींचीं आहेत. स्मार्त कर्में-विहीर तलाव आदि सर्व कर्में करणें अथवा सकाम यज्ञ कर्में करण्यानें हें फल प्राप्त होतें म्हणजे ही देवयोनि प्राप्त होते. याला पितृलोक असें नांव या कारणानें दिलेलें आहे कीं या योनिमध्यें आलेला मनुष्य पितापुत्र आदि संबंधापासून, अथवा शरीराच्या बंधनापासून विमुक्त होत नाहीं. शतपथ ब्राह्मणामध्यें लिहिलें आहे कीं— **स ह सर्वं तनुवेष यजमानो अमुष्मिंल्लोके संभवति।** (श० प० ब्रा० ४।६।१।१) अर्थात् 'तो यजमान शरीरासह स्वर्गामध्यें जन्म प्राप्त करतो.'

चन्द्रलोक असें याला नांव मिळण्याचें कारण असें आहे कीं येथें सुखही सुख याच्या उपभोगासाठीं प्राप्त होत असतें. चन्द्रमा हा शब्द 'चदि आह्लादे' या धातुवरून झालेला आहे म्हणून चन्द्रमा या शब्दाचा अर्थ सुखविशेष असा आहे.

या योनिमध्यें उत्पन्न झालेला मनुष्य सांसारिक ऐश्वर्याचाच उपभोग करीत असतो. यासाठीं वर्षाच्या या भागाला दक्षिणायन अथवा 'रयि' असें म्हटलेलें आहे व पुनः पुनः जन्म प्राप्त करण्याचें विधानही याच लोकांत-योनींत-उत्पन्न होणाऱ्या मनुष्यांसाठींच केलेलें आहे. ॥ ९ ॥

तथोत्तरेण तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया विद्ययात्मानमन्विष्यादित्यमभिजयन्ते। एतद्वै प्राणानामायतनमेतदमृतमभयमेतत् परायणमेतस्मान्न पुनरावर्तन्त इत्येष निरोधस्तदेषः श्लोकः १०

अर्थ— (अथ उत्तरेण तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया) आतां उत्तरायण-देवयान-मार्गानें तप करून, इंद्रिय संयम करून श्रद्धेनें व (विद्यया

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

आत्मानं अन्विष्य) ज्ञानानें आत्म्याचें अन्वेषण करून जे जातात ते (आदित्यं अभि जयन्ते) सूर्य लोकाला जिंकतात; प्राप्त करतात, (एतत् वै प्राणानां आयतनं) हें प्राणांचें स्थान आहे. (एतत् अमृतं अभयं एतत्) हें अविनाशी भयरहित असें हें (परायणं) परम श्रेष्ठ आश्रयस्थान आहे. (एतस्मात् न पुनरावर्तन्ते) या स्थानांपासून पुनः परत येत नाहींत. (इति एषः निरोधः) असा हा निवृत्तिमार्ग आहे. (तत् एषः श्लोकः) या विषयीं हा श्लोक प्रमाण आहे. (१०)

व्याख्या--तिसरी गति देवयान मोक्षमार्गानें जाऊन मोक्ष प्राप्त करणें ही आहे. या गतिचें वर्णन या वचनामध्यें आहे. मोक्ष प्राप्तिचें साधन ब्रह्मचर्य, तप, श्रद्धा व उत्तम ज्ञान हीं आहेत. या साधनांनीं आदित्य लोकावर विजय प्राप्त करण्याचा आशय असा आहे की हा आदित्य अप्रतिम प्रकाशाचा पुंज आहे व मुमुक्षु सुद्धां अप्रतिम ज्ञानाचा प्रकाश प्राप्त करून ब्रह्मलोक अथवा ईश्वरालाच प्राप्त होत असतो. या लोकांतून पुनः परत न फिरण्याचें वर्णन अन्य गतिंच्या तुलनेनें समजावयाचें आहे. या अन्य गतींचें वर्णन यापूर्वी आलेलें आहे. ज्यांमध्यें राहणारा मनुष्य वारंवार परत येतो म्हणजे जन्म घेत असतो.

पंचपादं पितरं द्वादशाकृतिं दिव आहुः परे अर्धे पुरीषिणम् । अथेमे अन्य उपरे विचक्षणं सप्तचक्रे षडर आहुरर्पितमिति ॥ ११ ॥

अर्थ-- (परे) कित्येक श्रेष्ठ विद्वान् या संवत्सरालाच-वर्षालाच- (पञ्चपादं पितरं) पांच पांय असलेला-पांच ऋतु ज्यामध्यें आहेत असा पिता, (द्वादश-आकृतिं) बारा आकृति म्हणजे बारा महिने ज्यामध्यें आहेत असा, (दिवः अर्धे पुरीषिणं) द्युलोकामध्यें जल धारण करणारा असें (आहुः) म्हणतात. (अथ उ परे इमे अन्ये) आणि दुसरे कोणी विद्वान् यालाच (सप्त

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

चक्रे षडरे) सात चक्रें व सहा आरे (विचक्षणं अर्पितं इति आहुः) विविध प्रकारांनीं वसवले आहेत असें म्हणतात. (११)

व्याख्या-- हा मंत्र अथर्ववेद ९।५।९ मध्यें आलेला आहे. या मध्यें वर्षाला पिता असें म्हटलेलें आहे. याचे पांच पाय म्हणजे पांच ऋतु आहेत असें म्हटलेलें आहे. हेमन्त व शिशिर यांना एक ऋतु मानलें म्हणजे वर्षाच्या सहा ऋतुंवद्दल पांच ऋतु असें कित्येक ठिकाणीं वर्णन केलेलें आहे. वेदांमध्यें ऋतुंनाहीं पितर म्हटलेलें आहे. या कारणानें या मंत्रांत वर्षालाही पितर असें म्हटलें आहे. द्युलोकामध्यें मेघरूपानें जलाचें असणें सर्वांना स्पष्टपणें दिसण्यासारखें आहे. सात चक्रें म्हणजे भूः भुवः स्वः आदि सात लोक प्रसिद्ध आहेत. सहा आरे हे सहा ऋतु होत. या दोनहीं पक्षांमध्यें वर्षाचा समय व्यापलेला आहे हें तर सिद्धच आहे.

मासो वै प्रजापतिस्तस्य कृष्णपक्ष एव रयिः शुक्लः प्राण-स्तस्मादेते ऋषयः शुक्ल इष्टिं कुर्वन्तीतर इतरस्मिन् ॥ १२ ॥

अर्थ— (मासः वै प्रजापतिः) महिना हा निःसंदेह प्रजापति आहे. (तस्य कृष्णपक्ष एव रयिः) त्याचा कृष्णपक्ष हा रयि आहे व (शुक्लः प्राणः) शुक्लपक्ष हा प्राण आहे. (तस्मात् एते ऋषयः) म्हणून हे ज्ञानी (शुक्ले इष्टिं कुर्वन्ति) शुक्ल पक्षांत यज्ञ करतात (इतरे इतरस्मिन्) दुसरे विद्वान् दुसऱ्या पक्षांत करतात. (१२)

व्याख्या-- ज्या प्रमाणें वर्ष हा ऋतु महिने आदि आपल्या प्रजांचा स्वामी आहे, म्हणून त्याला प्रजापति असें म्हणतात. त्याच प्रमाणें महिना हा ही आपल्या पक्ष दिवस आदि प्रजांचा स्वामी असल्यामुळें प्रजापति आहे. याच्या आंत दोन पक्ष आहेत. याच्या शुक्ल पक्षाला प्राण व कृष्ण पक्षाला रयि असें म्हटलेलें आहे. शुक्ल पक्षामध्यें निष्काम किंवा ज्ञानयज्ञ व कृष्णपक्षामध्यें सकाम यज्ञ केलें जातात. पण हा कांहीं सार्वत्रिक नियम नाहीं. याला अपवाद ही आहेत.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

अहोरात्रो वै प्रजापतिस्तस्याहरेव प्राणो रात्रिरेवरायिः प्राणं वा एते प्रस्कन्दन्ति ये दिवा रत्या संयुज्यन्ते ब्रह्मचर्य्यमेवै-तद्यद्रात्रौ रत्या संयुज्यन्ते ॥ १३ ॥

अर्थ-- (अहोरात्रः वै प्रजापतिः) दिवस व रात्र मिळून होणारा काल हा प्रजापति आहे. (तस्य अहः एव प्राणः) त्याचा दिवस हा प्राण आहे व (रात्रिः एव रयिः) रात्रि ही रयि आहे. (ये दिवा रत्या संयुज्यन्ते) जे दिवसा रति करतात, स्त्री संबंध करतात ते (एते प्राणं वै प्रस्कन्दन्ति) हे प्राणा-लाच क्षीण करतात. (यत् रात्रौ रत्या संयुज्यन्ते) जे रात्रीच्यावेळीं स्त्री संबंध करतात, ते (तत् ब्रह्मचर्यं एव चरन्ते) ब्रह्मचर्याचेंच पालन करतात. (१३)

व्याख्या-- येथें अहोरात्र हा घटिका, मुहूर्त पळ यांचा स्वामी असल्यामुळें त्याला प्रजापति म्हटलें आहे. दिवसा प्रकाशाचें प्रमाण अधिक असल्यामुळें दिव-साला प्राण व रात्री त्याच्या विरुद्ध स्थिति असल्यानें रात्रीला रयि म्हटलें आहे. सन्तान उत्पत्तिचें प्रारम्भाचें कार्य रात्रीच्या वेळींच झालें पाहिजे या संबंधी या वचनांत स्पष्ट उपदेश आहे. रात्रीच्या समयीं भोग्य शक्ति प्रबल असल्यामुळें रज वीर्याचें ग्रहण करून त्याला गर्भाचें रूप देण्यास रात्रीच्या वेळीं अधिक योग्य असतें. दिवसाला ही शक्ति रजामध्यें नसते यामुळें वीर्य व्यर्थ नाश पावतें व पुरुषाची प्राण शक्ति क्षीण होते.

अन्नं वै प्रजापतिस्ततो ह वै तद्रेतस्तस्मादिमाः प्रजाः प्रजायन्ते इति ॥ १४ ॥

अर्थ-- (अन्नं वै प्रजापतिः) अन्न च खरोखर प्रजापति आहे. (ततः ह वै तत् रेतः) त्या पासून तें रेत उत्पन्न होतें (तस्मात् इमाः प्रजा प्रजायन्ते इति) त्या पासून ह्या प्रजा उत्पन्न होतात. (१४)

व्याख्या—अन्नापासून वीर्य उत्पन्न होतें. या वीर्या पासून मनुष्य आदि

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

प्राण्यांची उत्पत्ति होते. या साठीं अन्नाला येथें प्रजापति असें म्हटलें आहे. कबंधी कात्यायनानें असा प्रश्न विचारला होता कीं ह्या प्रजा कां व कशा उत्पन्न होतात? या प्रश्नांचें उत्तर देतांनां पुढील तत्त्वें सांगितली, तीं अशीं--

सं० प्राणस्थानी, रयिस्थानी	विशेष
(१) प्राण ० रयि	सन्तान उत्पन्न होण्यासाठीं भोक्ता व भोग्य असले पाहिजेत. म्हणून उत्तराचा प्रारंभ येथूनच केला आहे.
(२) आदित्य चन्द्रमाः	वीर्याचें कारण अन्न आहे. तें उत्पन्न होण्यासाठीं या दोघांची आवश्यकता आहे.
(३) उत्तरायण दक्षिणायन	या दोघांची समष्टि वर्ष आहे. वर्ष म्हणजे वेळ. उत्पत्ति साठीं समय आवश्यक आहे.
(४) शुक्लपक्ष कृष्णपक्ष	वर्षांच्या नंतर महिन्यांची आवश्यकता आहेच.
(५) दिवस रात्री	येथें अंशरूपानें दिवसाला निषिद्ध ठरवून उत्पत्ति कार्यासाठीं रात्रींची उपयुक्तता अधिक आहे असें सांगितलें आहे.
(६) अन्न वीर्य	अन्न व वीर्य हीं सन्तानोत्पत्तिचीं मुख्य कारणें आहेत. म्हणून यांच्या वर्णनानेंच कबन्धी कात्यायनाच्या प्रश्नाचें उत्तर ऋषिनीं दिलें आहे.

तद्ये ह तत्प्रजापतिव्रतं चरन्ति ते मिथुनमुत्पादयन्ते तेषामेवैष ब्रह्मलोको येषां तपो ब्रह्मचर्यं येषु सत्यं प्रतिष्ठितम् १५

अर्थ— (तत् ये ह तत् प्रजापतिव्रतं चरन्ति) मग जे ल्या प्रजापति व्रताचें पालन करतात (ते मिथुनं उत्पादयन्ते) ते पुत्र पुत्री रूपी जोडी उत्पन्न करतात (येषां तपः ब्रह्मचर्यं) ज्यांचे साधन तप व ब्रह्मचर्य हें

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

आहे व (येषु सत्यं प्रतिष्ठितं) ज्यां मध्यें सत्य सुप्रतिष्ठित झालेलें असतें, (तेषां एव एषः ब्रह्मलोकः) त्यांनांच हा ब्रह्मलोक प्राप्त होतो.

तेषामसौ विरजो ब्रह्मलोको न येषु जिह्ममनृतं न माया चेति १६

॥ इति प्रथमः प्रश्नः ॥ १ ॥

अर्थ-- (तेषां एव एषः विरजः ब्रह्मलोकः) त्यांचाच हा निर्मळ असा ब्रह्मलोक आहे (येषु जिह्मं अनृतं न) ज्यांमध्यें कुटिलता व असत्य नसतें व (माया च न इति) व कपट ही नसतें. (१६)

व्याख्या--प्रश्नाचें उत्तर दिल्यानंतर फलश्रुतिचीं ही दोन वाक्यें आहेत. या वचनांत, गृहस्थी लोकांना हा उपदेश दिलेला आहे कीं जर ते या प्रजापति व्रताचें पालन करून संतान उत्पत्ति, तप, ब्रह्मचर्य आणि सत्य यांचें अनुष्ठान करून करतील, तर ते संतानोत्पत्ति करून ही. या तपाच्या गुणांनीं आपणास निर्मळ बनवून ते आपणास मोक्षाचे अधिकारीहि बनवतील.

येथें प्रथम प्रश्न समाप्त

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

अथ द्वितीयः प्रश्नः

अथ हैनं भार्गवो वैदर्भिः पप्रच्छ । भगवन्! कत्येव देवाः प्रजां विधारयन्ते । कतर एतत्प्रकाशयन्ते, कः पुनरेषां वरिष्ठ इति ॥ १७॥

द्वितीय प्रश्न

अर्थ— (अथ, ह एनं भार्गवो वैदर्भिः पप्रच्छ) या नंतर या पिप्पलाद ऋषींना भृगु पुत्र वैदर्भीनें प्रश्न विचारला. हे भगवन्! (कति एव देवाः प्रजां विधारयन्ते ?) किती वरें देव या शरीराचें धारण करतात ? (कतरे एतत् प्रकाशयन्ते) किती देव ह्याला प्रकाशित करतात ? (पुनः एषां कः वरिष्ठः इति) आणि यांमध्यें कोण श्रेष्ठ आहे वरें ? (१७)

व्याख्या—इन्द्रियें व प्राण यांचा संवाद उपनिषदांमध्यें पुष्कळ ठिकाणीं वर्णन केलेला आहे. हा प्रश्न ही याशीं संबंधित आहे. ज्या इंद्रियांच्या योगानें शरीर स्थिर राहतें त्या संबंधाचा प्रश्न व त्यांत श्रेष्ठ कोण याचें विवरण करून सांगा असा प्रश्न वैदर्भीनें येथें विचारला आहे.

तस्मै स होवाचाकाशो ह वा एष देवो वायुरग्निरापः पृथिवी वाङ्मनश्चक्षुः श्रोत्रञ्च । ते प्रकाश्याभिवदन्ति वयमेतद्बाण-मवष्टभ्य विधारयामः ॥ १८॥

अर्थ— (तस्मै सः ह उवाच) त्या प्रश्न विचारणाऱ्याला तो पिप्पलाद ऋषि म्हणाला. (ह वै एष देवः) निश्चयानें हे देव म्हणजे आकाश, वायु, अग्नि, आप, पृथिवी, वाणी, मन, चक्षु, श्रोत्र होत. (ते प्रकाश्य अभि वदन्ति) ते प्रकट होऊन एकमेकांशीं स्पर्धा करीत असें म्हणतात कीं (वयं एतत् बाणं अवष्टभ्य विधारयामः) आम्हीच या शरीराला स्तम्भाप्रमाणें आधार देऊन धारण करीत आहों. (१८)

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

तान् वरिष्ठः प्राण उवाच मा मोहमापद्यथाऽहमेव तत्पञ्चधाऽऽत्मानं प्रविभज्यैतद्बाणमवष्टभ्य विधारयामीति ॥१९॥

अर्थ-- (तान् वरिष्ठः प्राणः उवाच) त्यांना श्रेष्ठ प्राण म्हणाला. (मा मोहं आपद्यथ) असे भ्रमांत पडूं नका. (अहं एव पञ्चधा आत्मानं प्रविभज्य) मींच पांच प्रकारांनीं स्वतःला विभागून (एतत् बाणं अवष्टभ्य विधारयामि इति) या शरीराला स्थिर करून धारण करीत आहें. (१९)

व्याख्या--आकाशादि पञ्चमहाभूतां पासून इन्द्रिय गोलकांनीं बनलेलें हें स्थूल शरीर बनत असतें. आणि चक्षु आदि इंद्रियांच्या शक्ति अथवा खरीं वास्तविक इंद्रियें हीं सूक्ष्म भूतांपासून बनत असल्यामुळें तीं सूक्ष्म शरीराचीं अंग भूत आहेत. ही सर्व इंद्रियें एका दृष्टीनें एका पक्षांत आहेत व प्राणाचा पक्ष दुसरा आहे. इद्रियें समजतात कीं या जीवनाचें कारण तीं आहेत, पण प्राण याच्या उलट प्रतिपादन करीत आहे. तो म्हणतो कीं मींच प्राण अपान आदि पांच भेदांनीं सर्व शरीरांत व्यापून शरीराचें धारण करीत आहें.

तेऽश्रद्दधाना बभूवुःसोऽभिमानादूर्ध्वमुत्क्रमत इव तस्मिन्नुत्क्रामत्यथेतरे सर्व एवोत्क्रामन्ते तस्मिंश्च प्रतिष्ठमाने सर्व एव प्रतिष्ठन्ते, तद्यथा मक्षिका मधुकरराजानमुत्क्रामन्तं सर्वा एवोत्क्रामन्ते तस्मिंश्च प्रतिष्ठमाने सर्वा एव प्रातिष्ठन्त एवं, वाङ्मनश्चक्षुः श्रोत्रञ्च ते प्रीताः प्राणं स्तुवन्ति ॥ २० ॥

अर्थ-- (ते अश्रद्धानाः बभूवुः) तीं इंद्रियें यावर श्रद्धा ठेवीनातशीं झालीं, तेव्हां (सः प्राणः अभिमानात् ऊर्ध्वं उत्क्रमते इव) तो प्राण अभिमानानें वर निघून जातो असें करूं लागला, तेव्हां (इतरे सर्वे एव उत्क्रामन्ते) बाकीचीं सगळी इंद्रियें निघून जाऊं लागलीं व (च तस्मिन् प्रतिष्ठमाने) जेव्हां तो थांबूं लागला, तेव्हां (सर्वे एव प्रतिष्ठन्ते) तीं सर्व स्थिर

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

होऊं लागलीं. (तत् यथा) तेव्हां असें झालें कीं ज्या प्रमाणें (मधुकर-राजानं उत्क्रामन्तं) मधमाशांचा राजा उठला असतां (सर्वाः एव मक्षिकाः उत्क्रामन्ते) सर्व माशा वर उडतात व (च तस्मिन् प्रतिष्ठमाने) तो स्थिर झाला असतां (सर्वा एव प्रतिष्ठन्ते) सर्व माशा स्थिर राहतात (एवं वाङ् मनः चक्षु क्षोत्रं च) याच प्रमाणें वाणी मन चक्षु व श्रोत्र हीं इंद्रियें प्राण निघून जात असतां निघून जातात व तो स्थिर झाला असता हीं हो स्थिर राहतात. हें पाहून (ते प्रीताः प्राणं स्तुवन्ति) तीं सर्व मिळून संतुष्ट होऊन प्राणाची स्तुति करूं लागलीं. (२०)

व्याख्या--जेव्हां इंद्रियांचा प्राणाच्या बोलण्यावर विश्वास बसला नाहीं तेव्हां प्राणानें इंद्रियांचा विश्वास बसावा या उद्देशानें शरीरांतून निघून जाण्याचा प्रयत्न केला. प्राण शरीरांत असला तर सर्व इतर इन्द्रियें शरीरांत राहतात व तो निघून गेला असतां निघून जातात, ज्याप्रमाणें मधमाशांचा राजा आला असतां सर्व माशा येतात व तो गेला असतां सर्व माशा निघून जातात; त्या प्रमाणें जेव्हां वाणी आदि सर्व इंद्रियांना आपली निर्बलता व प्राणाची महत्ता समजली तेव्हां त्यांच्यामध्यें प्राणा संबंधाने प्रेम उत्पन्न झालें व तीं त्याची प्रशंसा करूं लागलीं.

एषोऽग्निस्तपत्येष सूर्य एष पर्जन्यो मघवानेष वायुरेष पृथिवी रयिर्देवः सदसच्चाऽमृतञ्च यत् ॥ २१ ॥

अर्थ - (एषः अग्निः तपति) हा प्राणच अग्नि रूपानें तापवीत असतो, (एषः सूर्यः) हा शरीर रूपी ब्रह्माण्डाचा सूर्य आहे, (एषः मघवान्) हा ऐश्वर्यमय आहे, (पर्जन्यः) हा पर्जन्य आहे, (एषः वायुः) हा वायु आहे व (एषः पृथिवी) हा पृथिवी रूप शरीराचा आश्रय आहे. तसेंच हा (रयिः देवः) पोषण करणारा देव आहे. तसेंच हा (सत् असत् अमृतं च) कारण, कार्य व अविनाशी तत्त्वही हाच आहे. (२१)

व्याख्या-- उपनिषदांमध्यें जेथें जेथें प्राणाची अग्नि, सूर्य, पर्जन्य, मघवान, वायु पृथिवी आणि रयि या रूपांमध्यें इंद्रियांच्या द्वारें स्तुति करविली आहे,

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

तेथें प्राणाला सत् (कारण) असत् (कार्य) व अमृत असेंही म्हटलेलें आहे. प्राण शरीरामध्यें आला तरच शरीर सजीव असल्याचीं चिन्हें दिसतात; यासाठीं या प्राणालाच कारण असें म्हटले आहे. आणि ती सूक्ष्म भूतांची रचना आहे. म्हणून या दृष्टीनें तें कार्यहीं आहे. मनुष्याचा मृत्यु झाला म्हणजे स्थूल शरीरांतील चक्षु आदि इन्द्रिय गोलक नाश पावतात, परंतु प्राण हा सूक्ष्म शरीराचें एक अंग असल्यानें तो एका स्थूल शरीरांतून निघून दुसऱ्यांत जातो. तो स्थूल शरीरावरोबर नाश पावत नाहीं. म्हणून याला –अविनाशी– अमृत असें म्हणतात.

अरा इव रथनाभौ प्राणे सर्वं प्रतिष्ठितम् । ऋचो यजूंष्षि सामानि यज्ञः क्षत्रं ब्रह्म च ॥ २२ ॥

अर्थ-- (रथनाभौ अरा इव) रथाच्या नाभिमध्यें जसे आरे बसविलेले असतात, त्या प्रमाणें (प्राणे सर्वं) प्राणामध्यें सर्व कांहीं म्हणजे ऋचा, यजु व सामें, यज्ञ, (क्षत्रं) बल, (ब्रह्म च) आणि ज्ञान हें सर्व (प्रतिष्ठितं) सुप्रतिष्ठित झालेलें आहे. (२२)

व्याख्या-- ज्या प्रमाणें चाकाच्या वुंध्यामध्यें चाकाचे सर्व आरे बसविलेले असतात, याचप्रमाणें प्राणामध्यें ऋचा, यजु, साम हे तीनही प्रकारचे मन्त्र ज्यांत आहेत असे चार वेद, वेद विहित यज्ञ, बल व सर्व प्रकारचें ज्ञान हें सर्व जोडले गेलें आहे. मनुष्याचें ज्ञान बल व शुभाशुभ कर्म आदि जें कांहीं आहे तें सर्व शरीरांत प्राण असेपर्यंतच होत असतें. प्राण नसेल तर यांपैकीं कांहींच होणें शक्य नाहीं. हें तर स्पष्टच आहे.

प्रजापतिश्चरसि गर्भे त्वमेव प्रतिजायसे तुभ्यं प्राण ! प्रजास्त्विमा बलिं हरन्ति यः प्राणैः प्रतितिष्ठसि ॥ २३ ॥

अर्थ-- हे प्राणा ! (यः प्राणैः प्रतितिष्ठसि) जो तूं पञ्च प्राणांसह शरीरांत राहत आहेस, तो तूं (प्रजापतिः गर्भे चरसि) प्रजांचा अध्यक्ष होऊन गर्भामध्यें संचार करतोस, (त्वं एव प्रतिजायसे) तूंच पुनः उत्पन्न होतोस,

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

(तुभ्यं इमाः प्रजाः वलिं हरन्ति) तुझ्यासाठींच यां सर्व प्रजा-हीं सर्व इंद्रियें वलि –भाग– अर्पण करीत असतात. (२३)

व्याख्या––शरीरामध्यें गर्भाशयांत गर्भ स्थापनेला कारण प्राण आहे. जर रज व वीर्य यांच्याशीं प्राणाचा संयोग होणार नाहीं तर गर्भाची स्थापनाच होणार नाहीं. प्राणामुळेंच गर्भ वाढतो व प्राणाच्या आश्रयानेंच बालकाची उत्पत्ति होत असते. इन्द्रियांनां भोजन करण्यानें जी पुष्टी मिळते त्यांप्रैकीं कांही भाग, तीं सर्व इंद्रियें, प्राणाला जेवढा आवश्यक आहे तेवढा, प्राणाला देतात. यालाच या वचनामध्यें वलि कर देणें असें म्हटलें आहे.

देवानामसि वन्हितमः पितृणां प्रथमा स्वधा । ऋषीणां चरितं सत्यमथर्वाङ्गिरसामपि ॥ २४ ॥

अर्थ –– (देवानां वन्हितमः असि) तूं सूर्य आदि देवांसाठीं अग्नि रूपानें हव्यवाहक आहेस. (पितृणां प्रथमा स्वधा) तूंच पितरांसाठीं मुख्य कव्य पदार्थ आहेस, (ऋषीणां सत्यं चरितं) ऋषींचे सत्य चरित्र तूंच आहेस व तूं (अंगिरसां अथर्वा) शरीराच्या अंगांना न सुकवणारा तूंच आहेस. (२४)

व्याख्या––यज्ञ द्वारें देवांना मिळणाऱ्या भागाला हव्य व पितरांना मिळणाऱ्या भागाला कव्य असें म्हणतात.

सूर्य आदि देवांचा भाग त्यांना अग्नि वायु यांच्या द्वारेंच मिळत असतो म्हणून येथें प्राणाला हव्यवाहक अग्नि असें म्हटलें आहे. पितरांनां पोचावयाचें कव्य ग्रहण करण्याचें कारण तर प्राण हाच आहे. सर्व इंद्रियांचें पोषण व त्यांचे सर्व व्यापार प्राणाच्या द्वारेंच होत असतात, म्हणूनच याला शरीराच्या भिन्न भिन्न अवयवांनां पुष्टि देणारा व त्यांना न सुकविणारा असें म्हटलें आहे.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

इन्द्रस्त्वं प्राण ! तेजसा रुद्रोऽसि परिरक्षिता। त्वमन्तरिक्षे चरसि सूर्यस्त्वं ज्योतिषां पतिः ॥ २५ ॥

अर्थ— हे प्राण। (त्वं तेजसा रुद्रः असि) तूं आपल्या तेजानें रुद्रासारखा तेजस्वी आहेस. (परिरक्षिता इन्द्रः असि) रक्षण करणारा ऐश्वर्यवान् आहेस. (त्वं अन्तरिक्षे चरसि) तूं अन्तरिक्षांत संचार करतोस. (त्वं ज्योतिषां पतिः सूर्यः) तूं नक्षत्रांचा स्वामी सूर्य आहेस. (२५)

व्याख्या— पुनः येथें प्राणाला तेजस्वी, रक्षक, इन्द्र व सूर्य म्हटलें आहे. त्याची तेजस्विता, रक्षकता व इन्द्रत्व तर प्रकटच झालेलीं आहेत. पण याला सूर्य का वरें म्हटलें आहे ? ज्या प्रमाणें प्राण हा शरीरामध्यें प्राण म्हणून कार्य करीत आहे; त्याच प्रमाणें वाह्य सृष्टीमध्यें वायु रूपानें तो राहिलेला आहे. शरीरामध्यें जसा तो इन्द्रियांचा स्वामी आहे असें समजतात, कारण कीं त्याच्या वांचून तीं जिवंतच राहूं शकत नाहींत व आपला व्यवहारही करूं शकत नाहींत. याच प्रमाणें विश्वामध्यें वायु शिवाय नक्षत्रांचें कांहीं कार्य होऊंच शकत नाहीं. या गोलकांवर जे प्राणी आहेत ते वायु वांचून जिवंतही राहूं शकत नाहींत. तसेंच यांच्या परिभ्रमणाचें कार्य पूर्ण होऊं शकत नाहीं. यामुळेंच प्राणाला नक्षत्रांचा स्वामी सूर्य असें म्हटलेलें आहे.

यदा त्वमभिवर्षस्यथेमाः प्राण ! ते प्रजाः। आनन्दरूपास्तिष्ठन्ति कामायान्नं भविष्यतीति ॥ २६ ॥

अर्थ— हे प्राण ! (यदा त्वं अभिवर्षसि) जेव्हां तूं मेघ रूपानें वृष्टि करतोस, (अथ ते इमाः प्रजाः) तेव्हां ह्या तुझ्या प्रजा (कामाय अन्नं भविष्यति इति) आतां पुरेसें अन्न मिळेल या आशेनें (आनन्दरूपाः तिष्ठन्ति इति) आनन्दित स्थितींत राहतात. (२६)

व्याख्या—येथें प्राणाला मेघाची उपमा दिली आहे. वृष्टीचा प्रारंभ वाफ बनण्यापासून अन्तीं वृष्टी होण्यापर्यंत होणाऱ्या प्रत्येक कार्यांत वायुचा संबंध आहे. या कारणानें प्राणाला येथे वृष्टीचें कारण म्हटलें आहे.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

व्रात्यस्त्वं प्राणैक ऋषिरत्ता विश्वस्य सत्पतिः।
वयमाद्यस्य दातारः पिता त्वं मातरिश्व नः ॥ २७॥

अर्थ-- हे प्राण ! (त्वं व्रात्यः) तूं संस्कारांची अपेक्षा नसलेला असा अर्थात् स्वभावतः शुद्ध आहेस. (एकः ऋषिः) एक ऋषि आहेस. (अत्ता) अग्नि रूपानें भक्षक आहेस (विश्वस्य सत्पतिः) विश्वाचा अधिपति आहेस. (वयं आद्यस्य दातारः) आम्ही तुला खाण्यास योग्य अशा अन्नाला देणारे आहों. हे (मातरिश्व) वायु रूप प्राणा ! (त्वं नः पिता) तूं आमचा पिता-रक्षक-आहेस. (२७)

व्याख्या-- स्मृति ग्रंथांमध्यें व्रात्य असें त्यास म्हणतात कि ज्याचा संस्काराच्या अवाधिपर्यंत यज्ञोपवीत संस्कार झालेला नसतो. या मर्यादेपुढें यास हा संस्कार करून घेण्याचा अधिकार नसतो. पण येथें प्राणाला व्रात्य असें याहून निराळ्या हेतूनें त्याची प्रशंसा करण्याच्या उद्देशानें म्हटलेलें आहे. अर्थात् जो स्वभावतः सुसंस्कृत असेल त्यास संस्कारांची आवश्यकता नाहीं. सर्वांचें तो ग्रहण करतो म्हणून त्यास अत्ता असें म्हणतात. विश्व म्हणजे येथें शरीरांतील जें काय आहे तें सर्व होय. यालाच येथें प्राण- सर्वांचा स्वामी- असें म्हटलेलें आहे.

या ते तनूर्वाचि प्रतिष्ठिता या श्रोत्रे या च चक्षुषि।
या च मनसि संतता शिवां तां कुरु मोत्क्रमीः ॥ २८॥

अर्थ-- (या ते तनूः वाचि) जी तुझी प्रसृत झालेली शक्ति वाणी-मध्यें (या च श्रोत्रे) जी कानामध्यें (या च चक्षुषि प्रतिष्ठिता) जी नेत्रा मध्यें राहिलेली आहे, (या च मनसि संतता) जी मनामध्यें व्यापलेली आहे. (तां शिवां कुरु) त्या शक्तिला मंगल करणारी कर, (मा उत्क्रमीः) तूं निघून जाऊं नकोस. (२८)

व्याख्या-- प्राणाची शक्ति सर्व इन्द्रियांमध्यें आहे. म्हणून च सर्व इंद्रियें प्राणाची प्रार्थना करतात कीं त्यांना शरीरामध्यें सुरक्षित ठेवून मंगल करणारीं बनव.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

प्राणस्येदं वशे सर्वं त्रिदिवे यत्प्रतिष्ठितम्। मातेव पुत्रान् रक्षस्व श्रीश्च प्रज्ञां च विधेहि न इति ॥२९॥

इति द्वितीयः प्रश्नः ॥ २ ॥

अर्थ-- (त्रि- दिवे यत् प्रतिष्ठितं) या तीनही लोकांमध्यें जें कांहीं आहे (इदं सर्वं प्राणस्य वशे) हें सर्व प्राणाच्या अधीन आहे. (माता इव पुत्रान् रक्षस्व) माता जशी मुलांचें संरक्षण करते, त्या प्रमाणें हे प्राण ! आमचें संरक्षण कर, आणि (श्रीः च प्रज्ञां च नः विधेहि इति) आम्हांला ऐश्वर्य आणि बुद्धि दे. (२९)

व्याख्या-- येथें प्राणाला शरीराच्या आंतील व शरीराच्यां बाहेरील वायु च्या व्यापक अर्थामध्यें घेतलें असून, त्या सर्वांचा संरक्षक याला म्हटलेलें आहे. तसेंच त्याच्याजवळ आपल्या संरक्षणासाठीं प्रार्थना करीत असतां ऐश्वर्य व प्रज्ञा प्राप्त व्हावी अशी इच्छा प्रदर्शित केली आहे.

प्राण प्रज्ञा बुद्धि कशी वरें देऊं शकतो ? याचें उत्तर स्पष्ट आहे तें असें कीं मनुष्य प्राणाच्या स्वार्थ रहित कार्याचा विचार करून व त्याचें अनुकरण करून च उत्तम बुद्धिचा स्वामी बनत असतो.

द्वितीय प्रश्न समाप्त

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

अथ तृतीयः प्रश्नः

अथ हैनं कौशल्यश्चाऽश्वलायनः पप्रच्छ। भगवन्! कुत एष प्राणो जायते कथमायात्यस्मिन् शरीर आत्मानं वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते केनोत्क्रमते कथं बाह्यमभिधत्ते कथमध्यात्ममिति ॥ ३० ॥

तृतीय प्रश्न

अर्थ-- (अथ ह एनं आश्वलायनः कौशल्यः पप्रच्छ) या नंतर या पिप्पलाद ऋषिंना अश्वलपुत्र कौशल्यनें प्रश्न विचारला किं, हे भगवन्! (एषः प्राणः कुतः जायते ?) हा प्राण कोठून उत्पन्न होतो ? (कथं अस्मिन् शरीरे आयाति) कसा ह्या शरीरांत येतो ? (आत्मानं वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते ?) आत्याला विभक्त करून कसा राहतो ? (केन उत्क्रमते ?) कसा बाहेर जातो ? (कथं बाह्यं अभिधत्ते) कसा बाह्य जगताला धारण करतो व (कथं अध्यात्मं इति) कसें अध्यात्म जगताला धारण करतो ? (३०)

व्याख्या-- प्राणाच्या संबंधानें कौशल्यानें हे सहा प्रश्न विचारले आहेत--

१ प्राण कोठून उत्पन्न होतो ?

२ या शरीरांत तो कसा येतो ?

३ आपणाला कशा रीतिनें विभक्त करून तो शरीरांत राहतो ?

४ शरीरांतून कसा निघून जातो ?

५ बाह्य जगाला कसें धारण करतो ?

६ अध्यात्म जगाला कसें धारण करतो ?

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

तस्मै सहोवाचातिप्रश्नान्पृच्छसि ब्रह्मिष्ठोऽसीति तस्मा त्तेऽहं ब्रवीमि ॥ ३१ ॥

आत्मन एष प्राणो जायते । यथैषा पुरुषे छायैतस्मिन्ने-तदाततं मनोकृतेनाऽऽयात्यास्मिन् शरीरे ॥ ३२ ॥

अर्थ-- (तस्मै सः ह उवाच) त्या प्रश्न कर्त्या ऋषिला ते पिप्पलाद ऋषि म्हणाले कि (अति प्रश्नान् पृच्छसि) तू उत्तम गंभीर प्रश्न विचारतोस म्हणून तू (ब्रह्मिष्ठः असि इति) ब्रह्मामध्यें निष्ठा ठेवणारा आहेस, (तस्मात् ते अहं ब्रवीमि) म्हणून तुला मीं सांगतों. (३१)

अर्थ-- (आत्मनः एषः प्राणः जायते) आत्म्यापासून हा प्राण उत्पन्न होतो. (यथा पुरुषे एषा छाया) जशी शरीरामध्यें ही छाया असते त्या प्रमाणें (एतस्मिन् एतत् आततं) या शरीरांत हा प्राण पसरलेला आहे. (मनो कृतेन अस्मिन् शरीरे आयाति) मनाच्या कर्मानें-वासनेनें या शरीरांत हा येतो. (३२)

व्याख्या— प्राण सूक्ष्म शरीराचें अंग आहे. सूक्ष्म शरीरासह आत्मा स्थूल शरीरामध्यें प्रविष्ट होत असतो. या साठींच या स्थूल शरीरामध्यें प्राणाच्या उत्पत्तिचें निमित्त आत्मा आहे असें येथें म्हटलें आहे. प्राण शरीरांतील एका विशेष देशामध्येंच राहतो असें नाहीं, तर तो सर्व शरीरभर छायेप्रमाणें पसरलेला असतो.

'मनोकृत' म्हणजे वासना होय. कर्मानें वासनेची उत्पत्ति होत असते. ही वासनाच जन्माला कारण होत असते. ही वासना त्या कर्मापासून उत्पन्न होते कि जीं कर्में फल भोगाच्या इच्छेनें केलीं असतात म्हणजे ज्यांना सकाम कर्में असें म्हणतात. याच वासनेमुळें जीव सूक्ष्म शरीरासह स्थूल शरीराला जन्माच्या द्वारें प्राप्त करीत असतो. पिप्पलाद ऋषिनें या साठींच दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर असें दिलें आहे कि, वासनेमुळें प्राण या स्थूल शरीरामध्यें येत असतो.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

यथा सम्राडेवाधिकृतान् विनियुङ्क्ते । एतान् ग्रामानेतान् ग्रामानधितिष्ठस्वेत्येवमेवैष प्राण इतरान्प्राणान् पृथक् पृथगेव संनिधत्ते ॥ ३३ ॥

अर्थ— (यथा सम्राट् एव अधिकृतान् विनियुंक्ते) ज्या प्रमाणें राजा अधिकारी लोकांची नियुक्ति करतो, (एतान् ग्रामान् एतान् ग्रामान् अधितिष्ठस्व) ह्या गांवांवर अधिकार चलिव असें त्यांस म्हणतो, त्या प्रमाणें (एवं एव एषः प्राणः) हा प्राण (इतरान् प्राणान्) दुसऱ्या प्राणांना (पृथक् पृथक् एव संनिधत्ते) पृथक् पृथक् च नियुक्त करतो. (३३)

व्याख्या— तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर या वचनानें दिलें आहे कीं ज्या प्रमाणें राजा आपल्या अधिकाऱ्यांना कामें वाटून देतो व प्रत्येक अधिकाऱ्याला पृथक् पृथक् स्थानांवर नियुक्त करतो, या प्रमाणें मुख्य प्राण दुसऱ्या प्राणांपैकीं प्रत्येकाला पृथक् पृथक् काम दाखवून भिन्न भिन्न स्थानांमध्यें नियुक्त करतो.

पायूपस्थेऽपानं चक्षुःश्रोत्रे मुखनासिकाभ्यां प्राणः स्वयं प्रतिष्ठते मध्ये तु समानः । एष ह्येतद्धुतमन्नं समं नयति तस्मादेताः सप्तार्चिषो भवन्ति ॥ ३४ ॥

अर्थ— (पायूपस्थे अपानं) मल व मूत्र इन्द्रियांमध्यें अपान (मुखनासिकाभ्यां चक्षुः श्रोत्रे) मुख नासिका व चक्षु श्रोत्र या ठिकाणीं (प्राणः स्वयं प्रातिष्ठते) प्राण स्वतः राहत असतो. (मध्ये तु समानः) मध्यें समान राहतो. (एषः हि हुतं अन्नं समं नयति) हा खाल्लेल्या अन्नाला सम परिपाक होण्यापर्यंत पोंचवितो. (तस्मात् एताः सप्त अर्चिषः भवन्ति) त्या पासून या सात ज्वाला—म्हणजे दोन डोळे, दोन कान, दोन नाकें व एक मुख हीं उत्पन्न होतात. (३४)

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

हृदि ह्येष आत्मा। अत्रैतदेकशतं नाडीनां तासां शतं शतमेकैकस्यां द्वासप्ततिर्द्वासप्ततिः प्रति शाखानाडीसहस्राणि भवन्त्यासु व्यानश्चरति ॥ ३५ ॥

अथैकयोर्ध्व उदानः पुण्येन पुण्यं लोकं नयति पापेन पापमुभाभ्यामेव मनुष्यलोकम् ॥ ३६ ॥

अर्थ-- (हृदि हि एषः आत्मा) हृदयामध्यें खरोखर हा आत्मा राहतो. (अत्र एतत् एक शतं नाडीनां) येथें एकशें एक नाड्या आहेत. (तासां एकैकस्याः शतं शतं) त्या प्रत्येकीमध्यें शंभर शंभर भेद होतात त्या मध्यें पुनः (प्रतिशाखा द्वासप्ततिः द्वासप्ततिः नाडीसहस्राणि भवन्ति) प्रत्येक शाखा नाडीमध्यें बहात्तर बहात्तर हजार भेद होतात. (आसु व्यानः चरति) यांमध्यें व्यान संचार करीत असतो. (३५)

अर्थ— (अथ एकया) त्या १०१ नाडी पैकीं एका नाडीनें (ऊर्ध्वः उदानः) वर जाणारा उदान आहे. (पुण्येन पुण्यलोकं) पुण्य कर्मानें पुण्यलोकाला, (पापेन पापं) पापानें पाप लोकाला, आणि (उभाभ्यां एव मनुष्यलोकं नयति) पापपुण्य या दोघांच्या योगानें मनुष्य लोकाला नेतो. (३६)

व्याख्या— कोण कोणता प्राण कोठें कोठें नेमलेला असतो याचें वर्णन या वचनामध्यें सांगितलें आहे. (१) अपान नामक प्राण मल मूत्र इंद्रिय विभागांत राहून आपलें काम करीत राहतो.

(२) मुख, नासिका, नेत्र व कान या क्षेत्रामध्यें प्राण स्वतः राहतो व तेथील कार्य तो करतो.

(३) शरीराच्या मध्य भागांतील नाभीच्या क्षेत्रामध्यें समान नामक प्राण राहतो त्याचें काम खाल्लेल्या अन्नाचें पोटांत पचन करणें हें आहे. येथून सात ज्वाला डोळे कान आदि शरीरावयवांकडे जाणाऱ्या निघतात. या केन्द्र स्थानाला जठराग्नि असेंही म्हणतात. याच्या योगानें भोजन उत्तम रीतिनें पचलें जातें व यामुळें सर्व शरीर पुष्ट होत असतें. जठर हेंच या ज्वालांचें नांव आहे.

(४) हृदयांतील आकाश हें आत्म्याचें निवासस्थान आहे. या हृदयापासून

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

यथा सम्राडेवाधिकृतान् विनियुङ्क्ते । एतान् ग्रामानेतान् ग्रामानधितिष्ठस्वेत्येवमेवैष प्राण इतरान्प्राणान् पृथक् पृथगेव संनिधत्ते ॥ ३३ ॥

अर्थ— (यथा सम्राट् एव अधिकृतान् विनियुंक्ते) ज्या प्रमाणें राजा अधिकारी लोकांची नियुक्ति करतो, (एतान् ग्रामान् एतान् ग्रामान् अधितिष्ठस्व) ह्या गांवांवर अधिकार चलिव असें त्यांस म्हणतो, त्या प्रमाणें (एवं एव एषः प्राणः) हा प्राण (इतरान् प्राणान्) दुसऱ्या प्राणांना (पृथक् पृथक् एव संनिधत्ते) पृथक् पृथक् च नियुक्त करतो. (३३)

व्याख्या— तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर या वचनानें दिलें आहे कीं ज्या प्रमाणें राजा आपल्या अधिकाऱ्यांना कामें वाटून देतो व प्रत्येक अधिकाऱ्याला पृथक् पृथक् स्थानांवर नियुक्त करतो, या प्रमाणें मुख्य प्राण दुसऱ्या प्राणांपैकीं प्रत्येकाला पृथक् पृथक् काम दाखवून भिन्न भिन्न स्थानांमध्यें नियुक्त करतो.

पायूपस्थेऽपानं चक्षुःश्रोत्रे मुखनासिकाभ्यां प्राणः स्वयं प्रतिष्ठते मध्ये तु समानः । एष ह्येतद्धुतमन्नं समं नयति तस्मादेताः सप्तार्चिषो भवन्ति ॥ ३४ ॥

अर्थ— (पायूपस्थे अपानं) मल व मूत्र इन्द्रियांमध्यें अपान (मुखनासिकाभ्यां चक्षुः श्रोत्रे) मुख नासिका व चक्षु श्रोत्र या ठिकाणीं (प्राणः स्वयं प्रतिष्ठते) प्राण स्वतः राहत असतो. (मध्ये तु समानः) मध्यें समान राहतो. (एषः हि हुतं अन्नं समं नयति) हा खाल्लेल्या अन्नाला सम परिपाक होण्यापर्यंत पोंचवितो. (तस्मात् एताः सप्त अर्चिषः भवन्ति) त्या पासून या सात ज्वाला—म्हणजे दोन डोळे, दोन कान, दोन नाकें व एक मुख हीं उत्पन्न होतात. (३४)

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

हृदि ह्येष आत्मा। अत्रैतदेकशतं नाडीनां तासां शतं शतमेकैकस्यां द्वासप्ततिद्वासप्ततिः प्रति शाखानाडीसहस्राणि भवन्त्यासु व्यानश्चरति ॥ ३५ ॥

अथैकयोर्ध्व उदानः पुण्येन पुण्यं लोकं नयति पापेन पापमुभाभ्यामेव मनुष्यलोकम् ॥ ३६ ॥

अर्थ-- (हृदि हि एषः आत्मा) हृदयामध्यें खरोखर हा आत्मा राहतो. (अत्र एतत् एक शतं नाडीनां) येथें एकशें एक नाड्या आहेत. (तासां एकैकस्याः शतं शतं) त्या प्रत्येकींमध्यें शंभर शंभर भेद होतात त्या मध्यें पुनः (प्रतिशाखा द्वासप्ततिः द्वासप्ततिः नाडीसहस्राणि भवन्ति) प्रत्येक शाखा नाडीमध्यें बहात्तर बहात्तर हजार भेद होतात. (आसु व्यानः चरति) यांमध्यें व्यान संचार करीत असतो. (३५)

अर्थ— (अथ एकया) त्या १०१ नाडी पैकीं एका नाडीनें (ऊर्ध्वः उदानः) वर जाणारा उदान आहे. (पुण्येन पुण्यलोकं) पुण्य कर्मानें पुण्यलोकाला, (पापेन पापं) पापानें पाप लोकाला, आणि (उभाभ्यां एव मनुष्यलोकं नयति) पापपुण्य या दोघांच्या योगानें मनुष्य लोकाला नेतो. (३६)

व्याख्या— कोण कोणता प्राण कोठें कोठें नेमलेला असतो याचें वर्णन या वचनामध्यें सांगितलें आहे. (१) अपान नामक प्राण मल मूत्र इंद्रिय विभागांत राहून आपलें काम करीत राहतो.

(२) मुख, नासिका, नेत्र व कान या क्षेत्रामध्यें प्राण स्वतः राहतो व तेथील कार्य तो करतो.

(३) शरीराच्या मध्य भागांतील नाभीच्या क्षेत्रामध्यें समान नामक प्राण राहतो त्याचें काम खाल्लेल्या अन्नाचें पोटांत पचन करणें हें आहे. येथून सात ज्वाला डोळे कान आदि शरीरावयवांकडे जाणाऱ्या निघतात. या केन्द्र स्थानाला जठराग्नि असेंही म्हणतात. याच्या योगानें भोजन उत्तम रीतिनें पचलें जातें व यामुळें सर्व शरीर पुष्ट होत असतें. जठर हेंच या ज्वालांचें नांव आहे.

(४) हृदयांतील आकाश हें आत्म्याचें निवासस्थान आहे. या हृदयापासून

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

१०१ नाड्या निघून त्या शरीरभर पसरलेल्या आहेत. पुनः त्या प्रत्येकाचे शंभर शंभर भेद होतात व पुनः त्या प्रत्येकाचे वहात्तर वहात्तर हजार भेद होतात.

१०१×१००=१०१००

१०१००×७२०००=७७२०००००

याचा अर्थ असा नव्हे कीं ही संख्या या नाड्यांची अगदीं अशीच आहे. या वर्णनाचें तात्पर्य एवढेंच आहे कीं हृदयापासून शुद्ध रक्त शरीरभर पोंचवणाऱ्या व शरीरांतून अशुद्ध रक्त हृदयापर्यंत आणणाऱ्या नाड्या असंख्य आहेत. ज्यांची गणना करणें अशक्य आहे. या सर्व नाड्यांमध्यें व्यान नांवाचा प्राण संचार करीत असतो. याचें काम हें आहे कीं रक्त शुद्ध ठेवणें व तें सर्व शरीरभर पोंचवणें.

(५) एकशें एक नाड्यांपैकीं एका नाडीच्या द्वारें वर जाणाऱ्या प्राणाचें नांव उदान आहे. हा उदान प्राण मृत्युच्या वेळीं शरीरांतून बाहेर पडणाऱ्या सूक्ष्म शरीरासह जीवाला त्याच्या कर्मानुसार भिन्न भिन्न ठिकाणीं पोंचवतो. हें चौथ्या प्रश्नांचेंही उत्तर आहे.

आदित्यो ह वै बाह्यः प्राण उदयत्येष ह्येनं चाक्षुसं प्राणमनुगृह्णानः । पृथिव्यां या देवता सैषा पुरुषस्यापानमवष्टभ्यान्तरा यदाकाशः स समानो वायुर्व्यानः ॥ ३७॥

अर्थ— (आदित्यः ह वै बाह्यः प्राणः) हा प्रसिद्ध सूर्य हा बाह्य प्राण आहे. हा (उदयति) प्रकाशित होत असतो. (एषः हि एनं चाक्षुषं प्राणं अनुगृह्णानः) हा सूर्य ह्या नेत्रांत राहणाऱ्या प्राणावर अनुग्रह करीतो. (पृथिव्यां या देवता) पृथिवी वर जी दैवी आकर्षक शक्ति आहे. (सा एषा पुरुषस्य अपानं अवष्टभ्य) ती ही शक्ति पुरुषाच्या अपानाला आकर्षून धारण करीत असते. (अन्तरा यत् आकाशः) मध्यस्थानामध्यें जो आकाशामध्यें वायु आहे (सः समानः, वायुः व्यानः) तो समान वायु होय व जो बाहेर वायु आहे तो व्यान होय. (३७)

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

तेजो ह वा उदानस्तस्मादुपशान्ततेजाः । पुनर्भवमिन्द्रियैर्मनसि संपद्यमानैः ॥ ३८ ॥

अर्थ— (तेजः ह वै उदानः) तेज हा उदान आहे (तस्मात् उपशान्त तेजाः) म्हणून चेतना रहित झालेला प्राणी (मनसि संपद्यमानैः इन्द्रियैः पुनः भवं) मनांत लीन होणाऱ्या इंद्रियांसह पुनः जन्माला प्राप्त होत असतो. (३८)

व्याख्या— आतां पांचव्या प्रश्नाचें उत्तर दिलें जात आहे. प्राण हा कसा बाह्य जगताला धारण करतो तें सांगतात--

(१) सूर्य बाह्य प्राण आहे असें सांगून तो उदय होतांच नेत्रामध्यें राहणाऱ्या प्राणावर अनुग्रह करतो,

(२) पृथिवीमध्यें जें आकर्षण आहे तें मनुष्य शरीरांत राहणाऱ्या अपानाला खेंचून धारण करीत असतें,

(३) सूर्य व पृथ्वी यांच्या मधील आकाश आहे तो समान आहे आणि-

(४) वायु हा व्यान प्राण आहे.

(५) तेज उदान आहे, म्हणून असें म्हटलें जातें कीं ज्यांचें तेज शान्त झालेलें असतें, असे प्राणी मनामध्यें लीन झालेल्या इंद्रियांसह पुनर्जन्माला प्राप्त होतात.

यच्चित्तस्तेनैष प्राणमायाति प्राणस्तेजसा युक्तः सहात्मना यथा संकल्पितं लोकं नयति ॥ ३९ ॥

अर्थ-- (यत् चित्तः तेन एषः प्राणं आयाति) जी चित्तामध्यें वासना असते त्या वासनेनें हा जीव प्राणाला प्राप्त होतो (प्राणः तेजसा युक्तः) प्राण तेजानें युक्त होऊन (आत्मना सह) आत्म्या सह (यथा संकल्पितं लोकं नयति) ज्या लोकाचा संकल्प केलेला असतो त्या लोकाला नेऊन तो पोंचवितो. (३९)

व्याख्या— आतां सहाव्या उपप्रश्नाचें उत्तर दिलें जात आहे. उपनिषदाचें हें उत्तर ' जी अन्तीं मति ती गति ' या म्हणीला सिद्ध करीत आहे. मनुष्य

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

मेल्यावर कोठें जातो ? याचें उत्तर असे दिलें आहे कीं जशी त्याच्या चित्तांत वासना असते त्या वासनेच्या अनुसार त्याची गति होते. या उत्तराचा भाव असा कीं चित्तांत असलेल्या वासनांच्या अनुसार जीव प्राणाला प्राप्त होतो व हा प्राण त्याला संकल्पित इच्छित लोकाला पोंचवतो.

य एवं विद्वान् प्राणं वेद । न हास्य प्रजा हीयतेऽमृतो भवति तदेषः श्लोकः ॥ ४० ॥

अर्थ-- (यः विद्वान एवं प्राणं वेद) जो विद्वान् या प्रामाणें प्राणाला जाणतो (ह अस्य प्रजा न हीयते) याची संतति नाश पावत नाहीं तो (अमृतः भवति) अमर होतो (तत् एषः श्लोकः) हें या श्लोकानें सिद्ध होतें. (४०)

व्याख्या— या प्राणविद्येला जाणण्याचें फळ येथें असें सांगितलें आहे कीं याची संतति नष्ट होत नाहीं-मरत नाहीं. आणि तो प्राणतत्त्व जाणणारा अमरता प्राप्त करतो. जो मनुष्याच्या प्राणांचे व्यापार जाणून त्याला अनुकूल कार्य करतो त्याची संतति कां बरें नष्ट होईल ? संतति नाश होण्याचें कारण प्रकृतिच्या नियमांचें उल्लंघन करणें हें आहे. प्राणतत्त्वज्ञ स्वार्थरहित व नियमबद्ध असें आपलें जीवन ठेवीत असल्यानें तो जीवन्मुक्त होऊन अमरत्व प्राप्त करतो.

उत्पत्तिमायतिं स्थानं विभुत्वं चैव पञ्चधा । अध्यात्मं चैव प्राणस्य विज्ञायाऽमृतमश्नुते विज्ञायाऽमृतमश्नुत इति ॥ ४१ ॥

इति तृतीयः प्रश्नः ॥ ३ ॥

अर्थ— (प्राणस्य उत्पत्तिं आयतिं) प्राणाची उत्पत्ति, त्याचें शरीरांत येणें, (पञ्चधा स्थानं विभुत्वं) पांच प्रकारें आपणाला विभक्त करून पांच स्थानांत राहणें व व्यापणें अशी (अध्यात्मं विज्ञाय) त्याची शरीरामध्यें स्थिति असते तें जाणून (अमृतं अश्नुते) अमरत्व प्राप्त होतें. (४१)

व्याख्या— या वचनानें पूर्वी सांगितलेली फलश्रुतिचीच पुष्टी होत आहे.

तृतीय प्रश्न समाप्त

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

अथ चतुर्थः प्रश्नः

अथ हैनं सौर्यायणी गार्ग्यः पप्रच्छ। भगवन्नेतस्मिन् पुरुषे कानि स्वपन्ति कान्यस्मिन् जाग्रति कतर एष देवः स्वप्नान् पश्यति कस्यैतत् सुखं भवति कस्मिन्नु सर्वे सम्प्रतिष्ठिता भवन्तीति ॥ ४२ ॥

चवथा प्रश्न

अर्थ— (अथ ह एनं सौर्यायणी गार्ग्यः पप्रच्छ) यानंतर सौर्याचा पुत्र गार्ग्य यानें येऊन पिप्पलाद ऋषिला प्रश्न विचारला. हे भगवन्! (एतस्मिन् पुरुषे कानि स्वपन्ति) या पुरुषामध्यें कोण निजतात? (कानि अस्मिन् जाग्रति) कोण येथें जागतात? (कतरः एषः देवः स्वप्नान् पश्यति) कोणता हा देव स्वप्नें पाहतो? (कस्य एतत् सुखं भवति) कोणाला हें सुख होतें आणि (कस्मिन् नु सर्वे संप्रतिष्ठिता भवन्ति इति) कोणामध्यें हे सगळे स्थिर होतात वरें? (४२)

व्याख्या— या प्रश्नामध्यें स्वप्न अवस्थेच्या संबंधानें पुढील प्रश्न विचारले आहेत.

१ या स्वप्न अवस्थेमध्यें कोण निजतात?

२ कोण जागत राहतात?

३ कोण स्वप्नाला पाहतात?

४ कोणाला या अवस्थेमध्यें सुख होतें?

५ कोणामध्यें हे सर्व स्थिर होतात?

या प्रश्नांचीं उत्तरें पुढें दिली जात आहेत--

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

तस्मै स होवाच। यथा गार्ग्य ! मरीचयोऽर्कस्यास्तं गच्छतः सर्वा एतस्मिंस्तेजोमण्डल एकीभवन्ति। ता पुनः पुनरुदयतः प्रचरन्त्येवं ह वै तत्सर्वं परे देवे मनस्येकीभवति तेन तर्ह्येष पुरुषो न शृणोति न पश्यति न जिघ्रति न रसयते न स्पृशते नाभिवदते नाऽऽदत्ते नानन्दयते न सृजते नेयायते स्वपितीत्याचक्षते ॥ ४३ ॥

अर्थ— (तस्मै ह सः उवाच) त्या प्रश्नकर्त्या गार्ग्याला त्या पिप्पलाद ऋषिनें उत्तर दिलें कि हे गार्ग्य ! (यथा अस्तं गच्छतः अर्कस्य) ज्याप्रमाणें अस्ताला जाणाऱ्या सूर्याचीं (सर्वाः मरीचयः) सर्व किरणें (एतस्मिन् तेजो मण्डले एकीभवन्ति) या तेजोमण्डल सूर्यामध्यें एकत्रित होतात व (पुनः पुनः उदयतः) पुनः पुनः उदय पावणाऱ्या सूर्याचीं तीं (ताः प्रचरन्ति) किरणें पुनः पसरलीं जातात, (ह वै एवं) निश्चयपूर्वक याच प्रकार (तत् सर्वं परे देवे मनसि) हें सर्व इंद्रिय सामर्थ्य सूक्ष्म प्रकाशमय मनामध्यें (एकी भवति) एकात्रित होत असतें. (तेन तर्हि) यामुळेंच तर या स्वप्न अवस्थेमध्यें (एष पुरुषः न शृणोति) हा पुरुष ऐकत नाहीं, (न पश्यीत) पाहत नाहीं, (न जिघ्रति) वास घेत नाहीं, (न रसयते) रस ग्रहण करीत नाहीं, (न स्पृशते) स्पर्श करीत नाहीं, (न अभिवदते) बोलत नाहीं. (न आदत्ते) पकडत नाहीं, (न आनन्दयति) आनन्दाचा अनुभव करीत नाहीं, (न विसृजते) कांहीं सोडीत नाहीं, (न ईयायते) चालत नाहीं, (स्वपिति इति आचक्षते) निजतो असें याला या वेळीं म्हणतात. (४३)

व्याख्या— पहिल्या पश्नाचें उत्तर एक उदाहरण देऊन दिलें आहे. पिप्पलाद ऋषि सांगतात कीं ज्याप्रमाणें अस्त होणाऱ्या सूर्यामध्यें त्याचीं सर्व किरणें एकत्रित होत असतात व जेव्हां तो पुनः उदय पावतो तेव्हां तीं किरणें पुनः चहूंकडे पसरतात. याचप्रमाणें जेव्हां मनुष्य निजतो, तेव्हां त्याच्या सर्व इंद्रियांच्या शक्ति मनामध्यें एकत्रित होतात, यामुळें स्वप्न अवस्थेमध्यें सर्व इंद्रियांचे व्यापार बन्द होत असतात व इंद्रियांसह मनुष्य निजतो असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

प्राणाग्नय एवैतस्मिन् पुरे जाग्रति । गार्हपत्यो ह वा एषोऽपानो व्यानोऽन्वाहार्यपचनो यद्गार्हपत्यात्प्रणीयते प्रणयनादाहवनीयः प्राणः ॥ ४४ ॥

यदुच्छ्वासनिश्वासावेतावाहुती समं नयतीति स समानः । मनो ह वाव यजमान इष्टफलमेवोदानः । स एनं यजमानमहरहः ब्रह्म गमयति ॥ ४५ ॥

अर्थ— (एतस्मिन् पुरे) या शरीरामध्यें यावेळीं (प्राणाग्नयः एव जाग्रति) अग्नि रूप प्राण जागत असतात. (एषः अपानः ह वै गार्हपत्यः) हा अपान खरोखर गार्हपत्य आग्न आहे (व्यानः अन्वाहार्यपचनः) व्यान दक्षिणाग्नि आहे. (यत् गार्हपत्यात् प्रणीयते) जो गार्हपत्य अग्निमधून वनवला जातो, यासाठीं त्याचें (प्रणयनात् प्राणः आहवनीयः) प्रणयन होत असल्यामुळें हा प्राणच आहवनीय अग्नि आहे. (४४)

अर्थ— (यत् एतौ उच्छ्वास-निश्वासौ) जे हे श्वास व उच्छ्वास रूपी (आहुतीः समं नयति) आहुतींना समत्वाकडे घेऊन जातात, म्हणून यालाच (सः समानः) समान असें म्हणतात. (ह मनः वाव यजमानः) निःसंशय मनच यजमान आहे. इष्टफलं एव उदानः) यज्ञाचें फलच उदान आहे, (सः एनं अहः अहः ब्रह्म गमयति) तो या यजमानाला प्रतिदिवशीं ब्रह्मसुखाप्रत पोंचवीत असतो. (४५)

व्याख्या— दुसऱ्या प्रश्नाच उत्तर असें आहे कीं, या शरीरामध्यें स्वप्न अवस्थेमध्यें अग्निरूप प्राण जागत असतो. या प्राणाला अग्निची उपमा तो जाग्रत असतो म्हणून दिलेली आहे. प्राणाच्या सर्व भेदांना अग्निच्या उपमेनें या प्रमाणें जागृतिरूपानें दाखवण्यांत आलें आहे. (१) अपान गार्हपत्य-

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

गृहस्थासंबंधींचा अग्नि आहे. (२) अन्वाहार्य पचन–वानप्रस्थ सेवित–अर्थात् दक्षिणाग्नि आहे. जो गृहस्थासंबंधींच्या अग्निच्या द्वारें प्रज्वलित होत असतो. (३) प्राण गृहस्थसेवित अग्निने प्रज्वलित होण्याच्या कारणानें आहवनीय–ब्रह्मचारी सेवित–अग्नि आहे. (४) श्वास व उच्छ्वास रूप आहुतींना समतेकडे नेणारा वायु समान या नांवानें प्रसिद्ध आहे. (५) मनरूप यजमानाला प्राप्त होणारें यज्ञफलच उदान आहे. या उदानाच्या योगानें मनरूपी यजमानाला प्रतिदिवशीं सुख प्राप्त होत असतें.

अत्रैष देवः स्वप्ने महिमानमनुभवति। यद्दृष्टं दृष्टमनुपश्यति श्रुतं श्रुतमेवार्थमनुशृणोति देशदिगन्तरैश्च प्रत्यनुभूतं पुनः पुनः प्रत्यनुभवति दृष्टं चादृष्टं च श्रुतं चाश्रुतं चानुभूतं चाननुभूतं च सच्चासच्च सर्वं पश्यति सर्वः पश्यति ॥४६॥

अर्थ— (अत्र स्वप्ने एषः देवः) या स्वप्न अवस्थेमध्यें हा मन रूपी देव आपल्या (महिमानं अनुभवति) महिम्याचा अनुभव घेत असतो (यत दृष्टं दृष्टं अनुपश्यति) जें पाहिलें असेल तें पाहिलेलेंच पुनः पाहतो, (श्रुतं श्रुतं एव अर्थं) ऐकलेल्या विषयाला ऐकल्याप्रमाणेंच (अनु शृणोति) पुनः ऐकतो. (देश दिगन्तरैः च अनुभूतं) देश देशान्तरामध्यें अनुभवलेल्या विषयांचा (पुनः पुनः प्रति अनुभवति) पुनः अनुभव घेतो. (दृष्टं च अदृष्टं) च पाहिलेले व न पाहिलेलें, (श्रुतं च अश्रुतं च) ऐकलेलें व न ऐकलेलें (अनुभूतं च अननुभूतं च) अनुभवलेलें व न अनुभवलेलें, (सत् च असत् च) असलें व नसलेलें असें (सर्वं पश्यति) सर्व कांहीं पाहतो व (सर्वः पश्यति) स्वतः सर्व होऊन पाहतो. (४६)

व्याख्या— आतां तिसऱ्या उपप्रश्नाचें उत्तर दिलें जात आहे. मन या स्वप्न अवस्थेमध्यें आपल्या महिम्याला पाहत असतें. पाहिलेलें, ऐकलेलें व

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

देश देशान्तरीं अनुभवलेले विषयच मन पुनः पुनः स्वप्नांत पहातें, ऐकतें व अनुभव घेत असतें. केवळ पाहिलेले, ऐकलेले व अनुभव घेतलेले च विषय मन पाहतें असें नसून, न पाहिलेले, न ऐकलेले व न अनुभवलेले, पण पूर्वजन्मीं पाहिलेले, ऐकलेले व अनुभवलेले विषय ही हें मन पुनः पाहतें, ऐकतें व अनुभव घेत असतें. या प्रमाणें या ठिकाणीं असलेले व नसलेले विषयसुद्धां हें पाहतें. या ठिकाणीं हें सांगितलें आहे कीं मनुष्य स्वप्नांत तें पाहतो, ऐकतो अथवा अनुभव घेतो तें या जन्मीं पाहिलेलें, ऐकलेलें व अनुभव केलेलें असेल अथवा पूर्व जन्मांत पाहिलेलें, ऐकलेलें अथवा अनुभव केलेले असेल, जें स्मृतिरूपानें चित्तामध्यें अंकित झालेलें असतें, तें सर्व हा स्वप्नांत पाहत असतो. याला स्वप्नांत असें कांहीं दिसत नाहीं कीं जें याच्या या जन्मीं अथवा पूर्व जन्मीं मिळविलेल्या ज्ञानाशीं संबंधित नसेल. पूर्व जन्मांत पाहिलेल्या व ऐकलेल्या विषयांना येथें अदृष्ट व अश्रुत असें म्हटलें आहे, तें या जन्मींच्या स्थूल देहांतील इन्द्रियांच्या दृष्टीनें म्हटलेलें आहे, अर्थात् जे या डोळ्यांनीं न पाहिलेले व या कानांनीं न ऐकलेले विषय आहेत ते. अदृष्ट व अश्रुत होत.

स यदा तेजसाऽभिभूतो भवति। अत्रैष देवः स्वप्नान्न पश्यत्यथ तदैतस्मिन् शरीर एतत् सुखं भवति ॥ ४७॥

अर्थ— (सः यदा तेजसा अभिभूतः भवति) तें मन जेव्हां तेजोहीन होतें (अत्र) या सुषुप्त अवस्थेमध्यें (एषः देवः) हा मनरूप देव (स्वप्नान् न पश्यति) स्वप्नें पाहत नाहीं, (अथ तदा एतस्मिन् शरीरे) या वेळीं या शरीरामध्यें (एतत् सुखं भवति) हें सुख होतें. (४७)

व्याख्या— आतां चौथ्या उपप्रश्नाचें उत्तर असें देत आहेत—जेव्हां हें मन तेजोहीन होतें, तेव्हां तिसऱ्या सुषुप्त अवस्थेला प्राप्त होऊन मन स्वप्नें पाहत नाहीं. त्यावेळीं या शरीरांत सुख प्राप्त होतें व यावेळीं या सुखाचा अनुभव घेणारा हा आत्माच असतो.

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.

Digitization by eGangotri-South Center

स यथा सौम्य वयांसि वासोवृक्षं संप्रतिष्ठन्ते । एवं ह वै तत्सर्वं पर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ४८ ॥

अर्थ— हे (सौम्य) प्रिय शिष्या ! (स यथा) यावेळीं ज्या प्रमाणें (वयांसि वासोवृक्षं संप्रतिष्ठन्ते) पक्षी आपल्या राहण्याच्या वृक्षावर येऊन वसतात (एवं ह वै) त्या प्रमाणेंच (तत् सर्वं परे आत्मनि) तें सर्व मन इंद्रियें आदि सूक्ष्म आत्म्यामध्यें (संप्रतिष्ठते) राहतें. ४८

पृथ्वी च पृथ्वीमात्रा चाऽऽपश्चाऽऽपोमात्रा च तेजश्च तेजोमात्रा च वायुश्च वायुमात्रा चाऽऽकाशश्चाकाशमात्रा च चक्षुश्च द्रष्टव्यं च श्रोत्रं च श्रोतव्यं च घ्राणं च घ्रातव्यं च रसश्च रसयितव्यं च त्वक् च स्पर्शयितव्यं च वाक् च वक्तव्यं च हस्तौ चाऽदातव्यं चोपस्थश्चाऽऽनन्दयितव्यं च पायुश्च विसर्जयितव्यं च पादौ च गन्तव्यं च मनश्च मन्तव्यं च बुद्धिश्च बोद्धव्यं चाहंकारश्चाहंकर्त्तव्यश्च चित्तं च चेतयितव्यं च तेजश्च विद्योतयितव्यं च प्राणश्च विधारयितव्यं च ॥ ४९ ॥

अर्थ–पृथिवी पृथिवीची तन्मात्रा (गन्ध) आप व आप्तत्त्वाची तन्मात्रा (रस), तेज व तेजाची तन्मात्रा (रूप), वायु व वायुची तन्मात्रा (स्पर्श), आकाश व आकाशाची तन्मात्रा (शब्द), नेत्र व दृश्य, कान व शब्द, नाक व गन्ध, जिव्हा व रस, त्वचा व स्पर्श, वाणी आणि वक्तव्य, हात व ग्रहण करण्यास योग्य पदार्थ, उपस्थ इंद्रिय व त्या पासून मिळणारें सुख, गुदद्वार व मलत्याग, पाय व चालणें. मन आणि मनन करणें, बुद्धि व ज्ञान, अहंकार व ममता, चित्त आणि

CC-0. In Public Domain. Cuddalore Collection. TN.